cmyk

## संपादकीय

### वाजले एकदाचे!

'कमिंग सून कमिंग सून' असे एखाद्या चित्रपटाच्या जाहिरातीद्वारे औत्सुक्य ताणले जावे तसे महायुती सरकारच्या खातेवाटपासंबंधी झाले होते. एखाद्या मुलाचे किंवा मुलीचे लग्न लांबले की त्यांना घोडनवरा अथवा घोडनवरी असे संबोधले जाते आणि अखेर त्यांचे दोनाचे चार झाले की वाजले एकदाचे झाले एकदाचे असे म्हणत सुस्कारा सोडला जातो. फडणवीस सरकारच्या खातेवाटपाबाबत असाच माहोल निर्माण झाला होता. राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचा शनिवार (२१ डिसेंबर) हा अखेरचा दिवस होता. अधिवेशनानंतरच राज्य मंत्रिमंडळाचे बहुप्रतीक्षित खातेवाटप जाहीर होणार असल्याचे महायुतीमधील सूत्रांचे म्हणणे होते.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... ©email:rajyaloktantra75@gmail.com


### पूजा खेडकरला अटक होणार

नवी दिल्ली : फसवणूक आणि चुकीच्या पद्धतीने ओबीसी आणि अपंग कोट्याचा लाभ मिळविल्याप्रकरणी आरोपी असलेल्या माजी आयएएस प्रशिक्षणार्थी पूजा खेडकरला मोठा धक्का बसला आहे. तिचा अटकपूर्व जामीन अर्ज दिल्ली उच्च न्यायालयाने फेटाळला आहे. पूजा खेडकरने षडयंत्र रचून देशाच्या प्रतिमेला हानी पोहोचवली असल्याचे न्यायमूर्ती चंद्र धारी सिंह यांच्या खंडपीठाने म्हटले आहे. यापूर्वी पूजा खेडकरला दिलेले अंतरिम अटकेचे संरक्षणही न्यायालयाने काढून टाकले आहे.

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–२४१ मंगळवार, दि.२४ डिसेंबर २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने– ६ किंमत ३ रूपये

# कुठं पाऊस, कुठं गारपीट तर कुठं थंडीचा कडाका

## कसे असेल आठवडाभर राज्यासह मराठवाड्यातील वातावरण?

**मुंबई । प्रतिनिधी**

**वातावरणात सातत्याने बदल होत आहे. कुठं थंडी तर कुठं ढगाळ वातावरण झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, संपूर्ण आठवड्यात राज्या**तील तापमान नेमके कसे राहिल? याबाबतची माहिती ज्येष्ठ हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिली आहे.

दि.२४ डिसेंबरला मुंबई, कोकणसहित संपूर्ण महाराष्ट्रात बोचऱ्या वाऱ्यासहित माफक प्रमाणात थंडीची शक्यता ही कायम





असल्याचे खुळे म्हणाले. त्यानंतर बुधवार आणि गुरुवार दिनांक २५–२६ डिसेंबरला ढगाळ वातावरणासहित किंचितशीच थंडी कमी होवून संपूर्ण महाराष्ट्रात ऊबदारपणा जाणवेल अशी माहिती खुळे यांनी दिली आहे. माणिकराव खुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवार ते शनिवार दिनांक २६ ते २८ डिसेंबर दरम्यानच्या तीन दिवसात संपूर्ण महाराष्ट्रात ढगाळ वातावरण राहून तुरळक ठिकाणी गडगडाटीसह किरकोळ पावसाची शक्यता जाणवते. त्यातही विशेषतः नंदुरबार धुळे जळगांव मालेगाव नाशिक नगर पुणे सातारा ◀◀ पान २ वर

### या परिसरात गारपीटीची शक्यता

सध्याच्या वातावरणीय घडामोडी पाहता शुक्रवार दिनांक २७ डिसेंबर ला संपूर्ण मध्य महाराष्ट्र व मराठवाडा तसेच विदर्भातील काही जिल्ह्यात असे एकूण २५ जिल्ह्यांत तूरळक ठिकाणी किरकोळ गारपीटीची शक्यता जाणवते. त्यातही विशेषतः नंदुरबार धुळे जळगांव नाशिक छत्रपती संभाजीनगर अकोला अमरावती नागपूर गोंदिया वर्धा वाशिम ह्या जिल्ह्यात व लगतच्या परिसरात गारपीटीची शक्यता अधिक जाणवते. वर्षाअखेरीस म्हणजे सोमवार दिनांक ३० डिसेंबरपासून हळूहळू थंडीत वाढ होवून नववर्षाच्या उगवतीला पुन्हा थंडीची अपेक्षा असल्याचे माणिकराव खुळे म्हणाले.

# पुन्हा एकदा लाडक्या बहिणींना लॉटरी

## राज्य सरकारनंतर आता केंद्राकडूनही मोठे गिफ्ट



**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार आले आहे. राज्य सरकारने अंतरिम अर्थसंकल्पामध्ये लाडकी बहीण योजनेची घोषणा केली होती. त्यानंतर लाडक्या बहिणींनी महायुतीला कौल दिला. आता पुन्हा एकदा लाडक्या बहिणींना राज्यानंतर केंद्राने मोठी भेट दिली आहे.**

लाडकी बहिण या योजनेंतर्गत ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न हे अडीच लाख रुपयांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील महिलांच्या बँक खात्यात दर महिन्याला दीड हजार रुपये जमा करण्यात येतात. या योजनेंतर्गत आतापर्यंत महिलांना पाच हाप्ते देण्यात आले आहेत, आता डिसेंबरचा हाप्ता देखील लवकरच मिळणार आहे.

दरम्यान आमचे सरकार जर पुन्हा सत्तेत आले तर आम्ही महिलांच्या खात्यात २ हजार १०० रुपये ◀◀ पान २ वर

### सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ तसेच राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी केले देशमुख कुटुंबीयांचे सांत्वन

# एकनाथ शिंदे तुमच्या सोबत, त्यांचा संदेश घेऊन आलोय!

## उद्योगमंत्री उदय सामंत यांनी देशमुख कुटुंबीयांची भेट घेत दिला धीर







**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत निर्घृणपणाने हत्या करण्यात आली, यातील एकही आरोपीला आम्ही सोडणार नाही अशी शासनाची भूमिका आहे हे सांगण्यासाठी व देशमुख कुटुंबीयांना शासन त्यांच्यासोबत खंबीरपणे आहे ही हमी देण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा संदेश आपणास देत आहोत, असे राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी देशमुख कुटुंबीयांचा सांत्वनाप्रसंगी सांगितले. तसेच बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी कायमस्वरुपी संपविण्याचा आमचा प्रयत्न राहील, असेही ते म्हणाले. सामंतांसह सामाजिक ◀◀ पान २ वर

### तीन दिवसात आरोपी अटक होतील–सिरसाट

श्री. शिरसाट यांनी आज येथे भेट देण्यापूर्वी बीड येथे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवंत यांची भेट घेऊन याप्रकरणी होत असलेल्या तपासाची माहिती घेतली. येत्या २८ डिसेंबर पर्यंत सर्व आरोपी अटक करण्यात येतील, असे पोलिस अधिक्षकांनी आश्वासन दिले असल्याचे सिरसाट म्हणाले. तसेच एक आरोपी अटक करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

### देशमुख कुटुंबांना घर मिळणार

देशमुख कुटुंबास घर नसल्याचे प्रसार माध्यमातून समोर आल्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुढाकार घेत त्यांना घर देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच घराच्या जागेची मंत्री उदय सामंत आणि मंत्री संजय सिरसाट यांनी पाहणी केली आहे.

# पंकजा मुंडेंना पर्णकुटी, धनंजय मुंडेंना सातपुडा बंगला

## महायुती सरकारच्या मंत्र्यांना बंगल्यांच्या चाव्या सुपुर्द; शिंदेंच्या मंत्र्यात मात्र नाराजी

**मुंबई । प्रतिनिधी**

**महायुती सरकारने आपल्या मंत्र्यांना बंगल्यांचे वाटप केले आहे. या यादीत अनेक ज्येष्ठ नेत्यांचा समावेश आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांना रामटेक, पंकजा मुंडे यांना पर्णकुटी, धनंजय मुंडे यांना सातपुडा तर विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना शिवगिरी बंगला देण्यात आला आहे. याशिवाय इतर मंत्र्यांना देखील बंगल्यांचे वाटप करण्यात आले आहे. तर शिंदेंच्या मंत्र्यांनी मात्र बंगले वाटपावर नाराजी व्यक्त करीत आम्हाला फ्लॅट दिले असल्याचे सांगितले.**

महायुती सरकारच्या मंत्र्यांना दालनापाठोपाठ बंगल्यांचेदेखील वाटप करण्यात आले आहे. महायुती सरकारमधील सर्व मंत्र्यांना बंगल्यांचे वाटप करण्यात आले आहे. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना रामटेक बंगला देण्यात आला आहे. तर भाजप नेत्या पंकजा मुंडे यांना पर्णकुटी बंगला देण्यात आला आहे. चंद्रशेखर बावनकुळे हे राज्याचे महसूल मंत्री आहेत. तर पंकजा





मुंडे या पर्यावरण मंत्री आहेत. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांना ज्ञानेश्वरी बंगला देण्यात आला आहे. तर विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना शिवगिरी बंगल्याचे वाटप करण्यात आले आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांना रामटेक तर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना रॉयलस्टोन बंगला देण्यात आला आहे. मंत्री हसन मुश्रीफ यांना (क–८) विशाळगड बंगला देण्यात आला आहे. मंत्री ◀◀ पान २ वर

# स्व.संतोष देशमुखांना न्याय देण्यासाठी जिल्हा एकवटला

## २८ तारखेला पोलीस अधीक्षक कार्यालयावर भव्य मोर्चा



**बीड । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील मस्साजोग गावचे दिवंगत सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना, सुत्रधारासह अटक करून कठोर शासन करा ही मागणी घेऊन आता संपूर्ण जिल्हा एकवटला आहे. सोमवारी (दि.२३) रोजी झालेल्या सर्वसमावेशक बैठकीत दि.२८ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्याचे सर्वानुमते ठरले.**

स्व.संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणातील सर्व आरोपी अद्यापपर्यंत अटक नाहीत. या प्रकरणाचा ◀◀ पान २ वर

### न्यायासाठी साथ द्या, माझ्यासारखी परिस्थिती कोण्या दुसऱ्या मुलीवर येऊ नये– वैभवी देशमुख


माझ्या वडिलांची अतिशय निर्दयीपणे हत्या करण्यात आली. अहोरात्र समाजासाठी काम करणार्या माझ्या वडीलांना नराधमांनी अपहरण करून जीवे मारले. हे प्रकरण देशभर गाजले असताना माझ्या वडिलांचे मारेकरी आणि त्यांचा सुत्रधार अजूनही अटकेत नाही, आम्हाला न्याय पाहीजे. राक्षसी प्रवृत्तीच्या या लोकांना कठोरात कठोर शासन झाले पाहिजे. माझ्या वडिलांना न्याय मिळवून देण्यासाठी किंबहुना माझ्यावर आलेली परिस्थिती आणखी कोणत्याच मुलीवर येऊ नये यासाठी साथ द्या अशी भावनिक साद या बैठकीदरम्यान स्व.संतोष देशमुख यांची मुलगी कु.वैभवीने घातली. वैभवीला ऐकताना उपस्थित प्रत्येकजण यावेळी हळहळला.


# भुजबळ घेणार अमित शहांची भेट


## फडणवीसांची घेतली भेट राष्ट्रवादी काँग्रेसपेक्षा भाजपचे नेते भुजबळांच्या बाजूने

**मुंबई । प्रतिनिधी**

मंत्रिमंडळात संधी न मिळाल्याने ओबीसी नेते व राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सोमवारी भेट घेतली. दोघांमध्ये ४५ मिनिटे चर्चा झाली असून मुख्यमंत्र्यांसह भाजपचे नेतेही भुजबळांच्या बाजूने असल्याचे दिसते. फडणवीसांनंतर आता भुजबळ हे केंद्रीय गृहमंत्री अमित







शहा यांची भेट घेणार असल्याने येत्या काही दिवसात ते वेगळा निर्णय घेतील, असे दिसते. ◀◀ पान २ वर

### आमदारांची समजुत काढण्याची गरज नाही–अजित पवार

महायुतीकडे २३७ आमदार असून बहुमतासाठी केवळ १४५ आमदार लागतात, त्यामुळे कोणत्या आमदाराची समजूत, मनधरणी करण्याची आता गरज नसल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सुचक वक्तव्य केल्याने भुजबळ यांच्या नाराजीवर ते तोडगा काढण्याच्या मुडमध्ये नसल्याचेच दिसते.

# ५ वी आणि ८ वीला नापास झालात तर पदोन्नती नाही

## केंद्रीय शिक्षण विभागाचा मोठा निर्णय

नवी दिल्ली । वृतसंस्था

पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्वाची अपडेट समोर येत आहे. नापास झाल्याने विद्यार्थी नैरश्यात जातात. यामुळे शालेय शिक्षणात नापास न करता पदोन्नती देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. पण आता या नियमात बदल करण्यात आला आहे.

पाचवी, आठवीला नापास झालेल्या विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणातील परीक्षा हलक्यात घेऊन चालणार नाही. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने मोठा निर्णय घेत नो डिटेन्शन पॉलिसी रद्द केली आहे. इयत्ता ५ वी आणि ८ वी च्या ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२३ डिसेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २.५० क्विंटल | २,६०० | २,६०० | २,६०० |
| ज्वारी/हायब्रिड: १३.५० क्विंटल | २,०९० | २,५८० | २,२०६ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : २५.५० क्विंटल | ६,९११ | ७,५०१ | ७,२३८ |
| उडीद : ११.०० क्विंटल | ६,३०० | ७,३०० | ६,७४० |
| बाजरी: ३.०० क्विंटल | २,४४० | २,४४० | २,४४० |
| मुग : १.५० क्विंटल | ६,८०१ | ६,८०१ | ६,८०१ |
| सोयाबीन: १०३.५० क्विंटल | ४,०५० | ४,०६० | ४,०५३ |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |

# दलित असल्यानेच सोमनाथची हत्या

## राहुल गांधींचा आरोप ;मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही हल्लाबोल

**परभणी । प्रतिनिधी**

**मी आज सुर्यवंशी कुटुंबीयांची भेट घेतली, ज्यांना मारहाण झाली त्यांचीही भेट घेतली. मला त्यांनी पोस्टमार्टम रिपोर्ट्स दाखवले, व्हिडिओ दाखवले, त्यावरुन ही १०० टक्के न्यायालयीन मृत्यू आहे, पोलिसांनीच त्यांची हत्या केली आहे. मुख्यमंत्र्यांनी विधानसभेच्या सभागृहात पोलिसांना मेसेज देण्यासाठी खोटे बोलले, असे म्हणत राहुल गांधींनी थेट देवेंद्र फडणवीस यांच्यावरच हल्लाबोल केला. सोमनाथ सूर्यवंशी हे दलित आहेत, ते संविधानाचे रक्षण करत होते म्हणून त्यांची हत्या करण्यात आली, असल्याचेही ते म्हणाले. सोमवंशी कुटुंबियांची सोमवारी राहुल गांधी यांनी भेट घेतली. यावेळी ते बोलत होते.**

काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोमवारी परभणी येथे जाऊन पीडित सुर्यवंशी कुटुंबीयांची भेट घेतली. परभणीतील आंदोलनानंतर पोलिसांनी अटक केलेल्यांमध्ये सोमनाथ सूर्यवंशी यांचाही समावेश होता. मात्र, न्यायालयीन कोठडीत त्यांचा मृत्यू झाल्यानंतर दलित समाज संतप्त झाला आहे. या घटनेचे पडसाद विधानसभेतही पाहायला मिळाले. तर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत ◀◀ पान २ वर

### राहुल गांधी जातीत द्वेष निर्माण करतात–फडणवीस

राहुल गांधी हे केवळ जातीत द्वेष निर्माण करीत असल्याचा पलटवार करीत यात ते राजकारण करीत असल्याचे म्हणाले. तर यात कोणी दोषी असतील तर त्यांना शिक्षा होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.



cmyk

## अग्रलेख

# वाजले एकदाचे!

'कमिंग सून कमिंग सून' असे एखाद्या चित्रपटाच्या जाहिरातीद्वारे औत्सुक्य ताणले जावे तसे महायुती सरकारच्या खातेवाटपासंबंधी झाले होते. एखाद्या मुलाचे किंवा मुलीचे लग्न लांबले की त्यांना घोडनवरा अथवा घोडनवरी असे संबोधले जाते आणि अखेर त्यांचे दोनाचे चार झाले की वाजले एकदाचे झाले एकदाचे असे म्हणत सुस्कारा सोडला जातो. फडणवीस सरकारच्या खातेवाटपाबाबत असाच माहोल निर्माण झाला होता. राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचा शनिवार (२१ डिसेंबर) हा अखेरचा दिवस होता. अधिवेशनानंतरच राज्य मंत्रिमंडळाचे बहुप्रतीक्षित खातेवाटप जाहीर होणार असल्याचे महायुतीमधील सूत्रांचे म्हणणे होते. विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असताना खातेवाटपावरून नाराजीनाट्य उफाळून येऊ नये यासाठी खातेवाटपाला जाणीवपूर्वक विलंब लावला जात आहे, असे सूत्रांचे म्हणणे होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचा ५ डिसेंबर रोजी शपथविधी झाल्यानंतर १५ डिसेंबर रोजी मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. त्यानंतर २० डिसेंबरपर्यंत खातेवाटप जाहीर झाले नव्हते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने विशिष्ट मागण्या केल्यानेच खातेवाटप हा विषय गुंतागुंतीचा झाला होता. केवळ मुख्यमंत्र्यांना एखादी फाईल अथवा प्रस्ताव मंजूर करण्याचा अधिकार होता. खातेवाटप न झाल्याने दोन्ही उपमुख्यमंत्री आणि अन्य ३९ मंत्री त्यांच्याकडे अधिकृतपणे एकही फाईल येत नसल्याने त्यांना 'बेकारी'चा अनुभव घ्यावा लागत होता. खातेवाटपाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेले असतानाच अखेर शनिवारी अधिवेशनाचे सूप वाजताच मुख्यमंत्री फडणवीस यांनी रात्री खातेवाटप जाहीर केले. महायुतीच्या सूत्रांनी आधी व्यक्त केलेला अंदाज चुकला. त्यांची अवस्था ग्लास अर्धा भरला, अर्धा रिकामा अशी झाली. गृहखात्यासाठी अडून बसलेल्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भाजपने ठेंगा दाखवला. मुख्यमंत्र्यांनी गृहखाते स्वत:कडे ठेवले.

शिंदे यांच्याकडे नगरविकास, गृहनिर्माण ही दोन महत्त्वाची खाती देण्यात आली. गृहखात्यासाठी एकनाथ शिंदे आग्रही होते. गृहखाते शिंदे यांना मिळेल अशी अपेक्षा त्यांचे सहकारी भरत गोगावले यांनी व्यक्त केली होती. अर्थ आणि नियोजन खाते मिळावे अशीही शिवसेनेची इच्छा होती. अर्थखाते अजित पवारांना देण्यास शिंदे गटाचा विरोध होता. कारण महाविकास आघाडीचे सरकार असताना शिवसेनेने अजित पवारांवर अनेक आक्षेप घेतले होते. मात्र, शिंदे यांच्या नाकावर टिच्चून फडणवीस यांनी अर्थखाते अजित पवारांकडेच सोपविले. मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांनी आपल्या पदाची शपथ घेतल्यानंतर तब्बल १० दिवसांनी नागपूर अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यात आला. २३० जागा जिंकून आलेल्या महायुतीतील घटक पक्षांमध्ये घमासान सुरू असल्यामुळे मंत्र्यांचे खातेवाटप जाहीर होत नव्हते. आता खातेवाटप जाहीर झाले असून गत ५ वर्षांपासून एकनाथ शिंदे यांच्याकडे असलेले नगरविकास खाते त्यांच्याकडेच कायम ठेवण्यात आले आहे.

नगरविकास खाते बहुधा मुख्यमंत्री स्वत:कडे ठेवत असतात मात्र महायुतीतील घटक पक्ष शिवसेनेला खुश करण्यासाठी तसेच गृहखात्याच्या मोबदल्यात भाजपने हे खाते शिंदेंना दिल्याची चर्चा आहे. शिवाय त्यांच्यावर गृहनिर्माण खात्याची जबाबदारीही देण्यात आली आहे. २३ नोव्हेंबरला निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी गृहखात्यासाठी जोरदार फिल्डिंग लावली होती. त्यामुळे सरकारचा शपथविधी ५ डिसेंबरपर्यंत लांबला होता. त्यानंतर महत्त्वाच्या खात्यांसाठी शिंदे अडून बसले. त्यामुळे खातेवाटप जाहीर होत नव्हते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी खातेवाटपात मुंबई आणि कोकणाला विशेष प्राधान्य दिले आहे. मुंबईतून मंगलप्रभात लोढा आणि आशिष शेलार यांच्याकडे तर कोकणातून अदिती तटकरे, उदय सामंत, भरत गोगावले, निलेश राणे, योगेश कदम यांच्याकडे महत्त्वाची खाती सोपवली आहेत.

अधिवेशनात मराठवाडा आणि विदर्भाच्या मुद्यावरून तसेच खातेवाटपाच्या विलंबावरून विरोधकांनी सत्ताधा-यांना घेरण्याचा प्रयत्न केला. त्याला चोख प्रत्युत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी चौफेर विकासावर आमचा भर असून रखडलेले प्रकल्प, योजना पूर्ण करण्याची ग्वाही दिली. गत अडीच वर्षांतील कामकाज, योजना यशस्वीपणे पुढे नेण्याची तसेच ते पूर्ण करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. सहा दिवसांच्या अधिवेशनात भरगच्च कामकाज केल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. हिवाळी अधिवेशनात मंत्र्यांनी बिनखात्याचे मंत्री म्हणून काम केले. अखेर खातेवाटप झाल्याने या मंत्र्यांना अधिकृत मंत्रालय मिळाले आहे. या खातेवाटपामुळे अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. अधिवेशनात १७ विधेयके मंजूर झाली. अधिवेशनात विदर्भ, मराठवाड्यासह बीड सरपंच हत्या, परभणीतील हिंसाचार, पोलिस कोठडीत आंदोलकाचा मृत्यू आणि कल्याणमधील मराठी कुटुंबाला अमराठी कुटुंबाकडून झालेली मारहाण आदी मुद्यांवरून विरोधकांनी सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला. कर्नाटकमधील अलमट्टी धरणाची उंची वाढविल्यामुळे महाराष्ट्रावर होणारा परिणाम ही मुख्यमंत्र्यांची डोकेदुखी ठरणार आहे.

नदीजोड प्रकल्पासंबंधीही ठोस पावले उचलावी लागतील. वर्षभर यासंबंधी नुसत्या चर्चाच होत असतात. सांडपाण्यावर प्रक्रिया करून मगच ते नदीत सोडले जाईल अशा योजना पूर्णत्वास कशा जातील तेही बघावे लागणार आहे. राज्याला प्रगत आणि समृद्ध करण्यासाठी फडणवीस सरकारला अथक प्रयत्न करावे लागतील. येत्या काळात सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी, त्यांच्या आयुष्यात आनंद निर्माण करण्यासाठी अनेक कल्याणकारी योजनांचे उद्दिष्ट सरकारला आपल्या डोळ्यासमोर ठेवावे लागेल. रुसवेफुगवे सोडून सरकारने आता कामाला लागले पाहिजे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृती जाळून महिलांना मुक्त केले

कोरो एकल महिला संघटना ही एक महिलांच्या प्रश्नाला घेऊन चळवळ सुरू झाली कोरोच्या माध्यमातून फेलोशिप कार्यक्रम मराठवाड्यात सुरू झाला २००८ पासून जे फेलोशिप कार्यक्रमात महिला घडल्या त्यामध्ये महिला या ३५ जनीं होत्या व त्या एकल होत्या व ज्या संस्थेच्या माध्यमातून जोडल्या होत्या त्या विविध सामाजिक काम करत आहेत, त्यामुळे महिलांच्या समस्या कोणत्या आहेत ते लक्षात घेऊन संघटना चे काम सुरू झाले, एकल महिलांचे सर्वाधिक प्रश्न घरात, समाजात दिसून येतात त्यांना सामाजिक बंधने सर्वात जास्त आहेत. मुलीला परक्याचे धन म्हणून वाढवले जाते, लग्न करताना विचारले जात नाही, जोडीदार निवडण्याचा तिला अधिकार नव्हता, लग्नानंतर तिची ओळख वेगळीच होते, पती निधनानंतर तिला कोणते नाव लावायचे हा प्रश्न होता, शासनाच्या विविध योजना घेण्यासाठी कागदपत्रे नसतात, त्यामुळे ती एकटी होते तिचे मानसिक संतुलन बिघण्याचे कारण होऊ शकते, महिलांचे आर्थिक, लैंगिक, मानसिक, शारिरीक,शोषण होते व हे शोषण थांबवावे, व महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी व त्याना माणूस म्हणून वागणूक मिळावी, यासाठी ही प्रक्रिया सुरू झाली होती. एकल महिलांचे संघटन उभे राहिले, व गाव ते स्वतः चे प्रश्न समोर येऊन ते त्यांच्या पुढाकारातून सोडवू लागल्या.

तसेच भारत देशाला स्वतंत्र मिळवून ७७ वर्षे लोटली त्यानंतरही मराठवाडा निजामाच्या ताब्यात होता १७ सप्टेंबर १९४८ ला मराठवाडा स्वतंत्र झाला, महाराष्ट्र व त्यातील मराठवाडा विभागाचे अनेक प्रश्न आहेत त्यामधील महिलांचे प्रश्न अजून खूप मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. एकल महिला संघटना ही महिलांनी महिलांसाठी चालवलेली चळवळ आहे ही एक प्रक्रिया आहे याची सुरुवात २०१४ पासून बीडमधून सुरुवात झाली होती. आणि कोरो एकल महिला संघटनाचे कार्य सुरू झाले, व ते झपाट्याने वाढत आहे. याचा महिलांना मोठा आधार मिळाला, भारतीय संविधानच्या विचारधारेवर संघटना हे काम सुरू असून एकल महिला म्हणजे विधवा परीतक्ता, घटस्फोट झालेल्या पतीला सोडून दिलेल्या अपंग, तृतीय पंथी, प्रौढ कुमारिका, इतर कोणत्याही कारणाने एकट्या असलेल्या सर्व महिला यांचा समावेश होतो. महिलांच्या अनेक खूप वेगळे समस्या आहेत त्यांना ते मांडण्याचे स्थान नाही, कुणी एकूण घेत नाही, समजून घेत नाही न्याय, स्वतंत्र, समता, बंधुता या मूल्याना धरून आज महिलांचे मोठ्या प्रमाणात संघटन बांधणी झाली व त्यातून वयक्तिक प्रश्न ते सामूहिक प्रश्न गावाचे प्रश्न, समाजाचे प्रश्न महिला पुढाकाराने सोडवू लागल्या. ज्याचा प्रश्न त्याचेच नेतृत्व* असावे यावर भर देऊन मोठ्या संख्येने महिला एकत्र येऊन सामाजिक, आर्थिक, राजकिय, सांस्कृतिक प्रश्न दूर करण्यासाठी एकत्र येऊन अनेक उपक्रम राबविण्यात आले. आपली संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती असून महिलांना दुय्यम स्थान दिलेले आहे. त्यामुळेच गावागावात ५० ते १०० महिलांचे महिला मंडळ स्थापन करण्यात आले व एकमेकांना त्या सपोट करू लागल्या गावशाखा बनल्या. व अनेक प्रश्न महिलांनी सोडवण्यास यश मिळवले.

मनुस्मृती दहन दिन – या मध्ये महिलांना अनेक प्रकारे मोठा विरोध होता जसे की, १) महिलांनी कधीच स्वतंत्र होऊ नये, २) स्रियांनी पहिला नवरा वारला तर कधीही दुसरे लग्न करू नये.३) पहिली पत्नी वारली तर तिचे दहन करून पतीने दुसरे लग्न करावे.४) पतीची सेवा हे पत्नीचे व्रत होय त्याच्या अज्ञात तिने राहणे.

५) माता बहीण मुलगी यांच्याबरोबर पुरुषाने एकांतात बसू नये.६) लग्नात वधूचे दान केले जाते त्यामुळे ती पतीच्या मालकीची वस्तू असते हे तिने कायम लक्षात ठेवावे. ७) जिला भाऊ नाही तिच्याशी शहाण्याने लग्न करू नये. ८) नवऱ्याने बायको सोडली, विकली तरी त्याची ती बायको वरची मालकी कायम राहते. ९) विवाहाच्या पूर्वी पित्याने, त्यानंतर पतीने म्हातारपणी मुलाने रक्षण करावे कोणतीही स्त्री स्वातंत्र्यस पात्र नाही. शिक्षणाचा अधिकार नव्हता, समानतेचा अधिकार नव्हता, पूर्णविवाह चा अधिकार नव्हता बालविवाह मोठया व्यक्तीबरोबर लग्न करून दिले जात होते. सती प्रथा होती, संपत्ती पासून महिलांना दूर ठेवले होते. जातीची उतरंड होती। उचनीचता केली जायची, लिंगभेद होता.

असे व अजून आपल्या कानाला ऐकू वाटणार नाही असे महिलांच्या जाचक मुद्दे लिहिलेले होते याच कारणामुळे महिलांच्या साठी उभे राहून भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे मनुस्मृती चे जाहीरपणे दहन केले व समाजातील तमाम सर्व महिलांना अशा जोखडातून मुक्त केले म्हणून च आज महिला स्वतंत्र जगत आहेत आणि मग एकल महिला संघटना च्या मुख्य उद्देश होता की, महिलांना सर्व प्रकारच स्वातंत्र्य मिळावे,, म्हणून मग सर्व गोष्टी लक्षात घेऊन महिला मोठ्या प्रमाणावर सामूहिक कार्यक्रमात सहभागी होतात. आणि सामाजिक बंधने तोडून स्वतः साठी मनासारखे जगू लागल्या आहेत सामाजिक बदल केले.

**सामाजिक व सांस्कृतिक बदल**

यामध्ये प्रामुख्याने महिलांनी स्वतः पासून सुरुवात केली तसेच सामूहिक एकत्रित येऊन बदल केले तिळगुळ कार्यक्रम, २०१६ पासून गावातील महिला मंडळाच्या वतीने विधवा झाल्यानंतर ३ तिसऱ्या दिवशी नियम मोडीत काढले व अनिष्ट प्रथा थांबवली (बांगड्या फोडणे, जोडवी, मंगळसूत्र, कुंकू पुसणे) विधवा पुनर्विवाह केले. ऐतिहासिक सहल काढणे, महिलांच्या कबड्डी स्पर्धा आयोजित करणे, रक्षाबंधन साजरे करणे, पेट्रोल पंप वर काम करणे, रिक्षा चालवणे, संविधान दिनानिमित्त दिंड्या काढणे,संविधान रॅली, महिलांच्या प्रश्नांसाठी, आंदोलन करणे, मोर्चे, अन्याय अत्याचार विरोधात उपोषण करणे, केशभूषा वेशभूषा, पिच्चर ला जाणे, हॉटेलमध्ये जेवण करणे, गावासाठी बस सुरू केले, महिलांनी मारुती मंदिरात गाभाऱ्यात प्रवेश केले, एकटीच प्रवास करणे, स्वतः चे प्रश्न मांडणे, सोडवणे, विविध प्रकारच्या शासकीय योजनांचा लाभ घेतले, घरे नावावर केली, आर्थिक पत वाढवली, संपत्ती नावावर केली, सासरची व माहेरच्या संपत्ती मध्ये अधिकार मिळवला. सासरची शेत, जमीन, नावावर करून घेतले.

**शैक्षणिक व आर्थिक बदल**

महिलांचे कमी वयात लवकर लग्न झाल्यामुळे तिचे लग्नानंतर शिक्षण थांबायचे ते एकल महिला संघटना च्या माध्यमातून १०,१२, , , नर्सिंग कोर्स, कॉम्प्युटर कोर्स अशा प्रकारे शिक्षण घेऊन पूर्ण केले तर यावितिरिक्त ब्युटीपार्लर, टेलरिंग कोर्स, मेहंदी रांगोळी, विणकाम करणे केक मेकिंग, पापड उद्योग, मसाले उद्योग, किराणा, जनरल स्टोअर, आदी व्यवसाय शिक्षण घेऊन आर्थिक पत वाढवली. निबंध स्पर्धा, शैक्षणिक साहित्य वाटप करून साहाय्य केले. समाजात ज्या साठी महिलांना विरोध होता ते सर्व भारतीय संविधान च्या कायद्याच्या चौकटीत राहून अधिकार प्राप्त करून घेतले. न्याय मागण्याचा अधिकार मुळे अनेक महिलांच्या कोर्टात केसेस दाखल होऊन यश मिळाले तर हिंसाचे प्रमाण कमी झाल्या स्वतंत्र चा अधिकार महिला मिळाल्यामुळे, विधवा विवाह केले समानतेचा अधिकार मिळाल्यामूळे आंतरजातीय विवाह होत आहेत. अनेक सामाजिक परिवर्तन घडवून आले, महिलांना समान संपत्तीत अधिकार मिळाला, शिक्षणाचा अधिकार मिळाला, घटस्फोट चा अधिकार, विधवा पुनर्विवाह चा अधिकार, मतदानाचा अधिकार, निवडणूक लढण्याचा अधिकार, पोटगीचा मागण्याचा अधिकार, वारसा हक्क अधिकार, हुंडा प्रतिबंधक कायदा, संरक्षणचा अधिकार, कौटुंबिक हिंसाचार कायदा, महिलांना डीलव्हरी रजेचा अधिकार असे अनेक कायदे महिलांसाठी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी काढून महिलांचा आयुष्यभराचा आधार बनले आहे हा आपण दिवस कधी विसरू शकणार नाहीत.

**राजकीय**

आज एकल महिला संघटना च्या महिला मंडळाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर महिला ग्रामसभेत प्रश्न उपस्थित करत आहेत मुद्दे मांडत आहेत तर महिलांनी देखील निवडणूक सहभागी झाले पाहिजे कारण महिलांच्या समस्या महिलांना चांगल्या माहिती असतात आणि २०१९ पासून महिला गावपातळीवर सरपंच सदस्य साठी निवडणूक लढवत आहेत यामध्ये महिला सरपंच, सदस्य पंचायत समितीच्या सदस्य म्हणून कारभार ओहत आहेत तर वेगवेगळ्या प्रकारच्या समितीच्या अध्यक्ष सदस्य म्हणून जबाबदारी पार पाडत आहेत.

**कौटुंबिक हिंसाचार/ संपत्ती अधिकार–**

आज समाजात महिलांसाठी हक्क आहेत पण त्या बाबत जागरूकता दिसत नाही. आज देखील एकल महिलांच्या केसेस व संपत्तीत अधिकार मिळण्यास खूप समस्या आहेत याला कारण आपली संस्कृती आहे व नेमके तिथेच महिलांना यश मिळायला उशीर होतो. आपल्याकडे सत्ता सोडण्याची तितकी मानसिकता तयार होणे गरजेचे आहे, महिला समुपदेशन सुरू केले, पोलीस यंत्रणा ते शासकीय अधिकारी यांच्या ओळखी झाल्या, समाजात अशा कोणतेही क्षेत्र नाही जिथे महिला नाहीत, शेती कसण्यापासून ते देश चालवणे पर्यंत चा प्रवास महिलांनी केला आहे, ट्रक चालवणे, बस चालवणे, महिला लाईनमन, डॉक्टर, अभिनेत्री, लेखकिका, पत्रकार, इंजिनिअर, वकील, पोलीस, कलेक्टर, वैमानिक, वैज्ञानिक, अंतराळवीर, सरपंच, सभापती, आमदार, खासदार, पंतप्रधान, ते राष्ट्रपती होण्याचा मान मिळवला व चांगल्या प्रकारे गाव ते राज्य, देशाचा कारभार चालवत आहेत. महिलांच्या शिवाय आपण काहीच विचार करू शकत नाही. तरी आजच्या युगात मोठ्या प्रमाणावर समाजात विषमतेची जाळे असून जातीभेद, धर्मभेद, लिंगभेद दूर करून सर्वांनी विसरून सर्वधर्म समभाव व बंधुभावाने सर्वांना माणूस म्हणून जगता यावे व समानतेची वागणूक मिळावी. पुस्तकीज्ञान बरोबरच सामाजिक भान येणं आवश्यक आहे.

**रुक्मिणी नागापुरे बीड**
**कोरो एकल महिला संघटना**
**मो.९०४९०२५४१५**

## पान १ वरून...

### कुठं पाऊस, कुठं गारपीट

कोल्हापूर सोलापूर छत्रपती संभाजीनगर अकोला अमरावती नागपूर वाशिम शेगाव नगर पुणे नागपूर गोंदिया चंद्रपूर नांदेड परभणी जिल्ह्यात व लगतच्या परिसरात पावसाची शक्यता अधिक जाणवते. या बदलत्या वातावरणात शेतकऱ्यांनी पिकांची काळजी घेणं गरजेचं आहे. शेतकऱ्यांनी, रब्बी पिकांचे सिंचन, तणनियंत्रण व खत नियोजन यांचा मेळ घालून पीक वाढीचा वेग–दर साधावा. या दिवसाच्या थंडीचा लाभ उठवावा, असेही खुळे यावेळी म्हणाले. कारण डिसेंबरातील थंडीच्या मासिक अंदाजनुसार, शेवटच्या आठवड्यात कमाल व किमान अशी दोन्हीही तापमाने, सरासरीपेक्षा अधिक राहून, थंडी सरासरीपेक्षा कमी जाणवण्याची शक्यता आहे.

-------------

### एकनाथ शिंदे तुमच्या सोबत,

न्यायमंत्री संजय सिरसाट, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनीही देशमुख कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन केले. संतोष देशमुख खुन प्रकरणाचे पडसाद संपुर्ण राज्यात उमटले. जागोजागी आंदोलन करुन आरोपींना तात्काळ अटक करुन त्यांना शिक्षा देण्याची मागणी होत आहे. मस्साजोग येथे राज्यातील नेते, मंत्र्यांनी येऊन देशमुख कुटुंबाची भेट घेत सांत्वन केले आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सोमवारी मस्साजोग येथे देशमुख कुटुंबाची भेट घेत सांत्वन केले. या प्रकरणात असणारे मुख्य आरोपी तसेच त्यामागील सूत्रधार यांना आठवड्याभरात अटक करून कारवाई करण्यात येईल असे याप्रसंगी सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी गावकऱ्यांशी बोलताना सांगितले. यावेळी देशमुख कुटुंबीयांनी चर्चा केल्यानंतर मंत्री उदय सामंत यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या प्रकरणी एसआयटी गठीत करण्यात आलेली असून न्यायालयीन चौकशी देखील करण्यात येत आहे, त्यामुळे या प्रकरणात लवकरात लवकर दोषीना शिक्षा व्हावी तसेच देशमुख कुटुंबीयांना न्याय मिळावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आदेश दिले आहेत असेही ते म्हणाले. पंधरा वर्षे सार्वजनिक जीवनात राहून स्वतःचे साधे घरही न बांधणारे दिवंगत सरपंच देशमुख यांची गावाच्या विकासाची तळमळ त्यांच्या कामातून लक्षात येते व या पुढील काळातही त्याच प्रकारचा विकास या गावात होईल याची खबरदारी शासन घेईल असे सामंत यांनी ग्रामस्थांशी चर्चा करताना सांगितले.

याबाबत सातत्याने मागणी करणाऱ्या राज्यातील सरपंच संघटनेच्या निवेदनाची दखल शासनाने घेतली आहे असेही उदय सामंत यावेळी म्हणाले. देशमुख यांच्या कुटुंबीयांना शिवसेनेतर्फे मदत देण्यात येईल असे सांगून सामंत यांनी देशमुख यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी देखील आम्ही घेत आहोत असे यावेळी सांगितले. जी घटना घडली ही अतिशय निंदनीय आहे याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूर्ण तपासाचे निर्देश दिले आहेत त्यामुळे येणाऱ्या काळात देशमुख कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यास शासन कटीबद्ध आहे असे राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी यावेळी भेटीदरम्यान सांगितले.

-----------

### पुन्हा एकदा लाडक्या

जमा करू असे आश्वासन त्यावेळी महायुतीकडून देण्यात आले. आता राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार आलं आहे. त्यामुळे २ हजार १०० रुपये खात्यामध्ये कधीपासून जमा होणार याकडे देखील सर्वांचं लक्ष लागलं आहे. मात्र त्यासाठी थोडी वाट पाहावी लागण्याची शक्यता आहे. या अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्याबाबत निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. दरम्यान आता आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे. पुण्यात बोलताना त्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी याबाबत माहिती दिली. नवे सरकार सत्तेत येताच केंद्राकडून राज्याला मोठे गिफ्ट मिळाले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत एकाच वर्षात महाराष्ट्रासाठी तब्बल वीस लाख घरांना मंजुरी मिळाली आहे. याबाबत केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज चव्हाण यांनी घोषणा केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. एकाच वर्षात तब्बल वीस लाख घरांना मंजुरी देण्यात आली आहे, याचा लाभ हा जे जे बेघर आहेत, त्या सर्वांना मिळेल. विषेत: लाडका शेतकरी आणि लाडक्या बहिणींना या घराचा लाभ मिळून देण्याचा प्रयत्न असेल असे देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी म्हटले आहे. त्यामुळे आता लाडक्या बहिणींना हक्काच्या पैशांसोबतच हक्काचे स्वत:च घर देखील मिळणार आहे.

-------------

### स्व.संतोष देशमुखांना न्याय देण्यासाठी

सुत्रधार असलेल्या वाल्मीक कराडचे नाव अद्यापपर्यंत स्व.संतोष देशमुख अपहरण आणि हत्या प्रकरणात घेतले गेलेले नाही. जिल्ह्यातील सर्व आमदारांनी हिवाळी अधिवेशनात या प्रकरणात आवाज उठवला होता. आ.संदीप क्षीरसागर यांनी अधिवेशनापूर्वी वाल्मीक कराडसह सर्व आरोपींना अटक करा अन्यथा जिल्ह्यातील जनता रस्त्यावर उतरेल असा इशाराही दिला होता. परंतु प्रशासनाने सदरील विषय गांभीर्याने घेतलेला दिसत नाही. ज्या गंभीर घटनेने अवघा महाराष्ट्र हळहळला, या घटनेकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेले असतानाही या गुन्ह्यातील आरोपी मोकाट आहेत! हा सर्व प्रकार अत्यंत संतापजनक आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्व पक्ष, सर्व सामाजिक संघटना आणि सामाजिक कार्यकर्ते तसेच सर्वच क्षेत्रातील लोकांनी एकत्र येऊन दि.२८ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वा. बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते पोलीस अधीक्षक कार्यालय मोर्चा काढण्यात येणार आहे.

-------------

### पंकजा मुंडेंना पर्णकुटी,

चंद्रकांत पाटील यांना ब–१ सिंहगड देण्यात आला आहे. मंत्री गिरीश महाजन यांना सेवासदन बंगला देण्यात आला आहे. मंत्री गुलाबराव पाटील यांना जेतवन बंगला देण्यात आला आहे. मंत्री गणेश नाईक यांना ब–४ पावनगड हा बंगला देण्यात आला आहे. मंत्री दादा भुसे यांना ब–३ जंजीरा बंगला देण्यात आला आहे. मंत्री संजय राठोड यांना शिवनेरी बंगला देण्यात आला आहे. मंत्री धनंजय मुंडे यांना सातपुडा बंगला देण्यात आला आहे. मंत्री मंगलप्रभात लोढा यांना ब–५ विजयदुर्ग बंगला देण्यात आला आहे. मंत्री उदय सामंत यांना मुक्तागिरी बंगला देण्यात आला आहे. मंत्री जयकुमार रावल यांना चित्रकुट बंगला देण्यात आला आहे. मंत्री पंकजा मुंडे यांना पर्णकुटी बंगला देण्यात आला आहे. मंत्री अतुल सावे यांना अ–३ शिवगड बंगला देण्यात आला आहे. मंत्री अशोक उईके यांना अ–९ लोहगड देण्यात आला आहे. मंत्री शंभूराज देसाई यांना मेघदुत बंगला देण्यात आला आहे. मंत्री आशिष शेलार यांना रत्नसिंधू बंगला देण्यात आला आहे. मंत्री आदिती तटकरे यांना प्रतापगड बंगला देण्यात आला आहे. मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांना पन्हाळगड देण्यात आला आहे. मंत्री माणिकराव कोकाटे यांना अंबर बंगला देण्यात आला आहे. मंत्री जयकुमार गोरे यांना प्रचितीगड हा बंगला देण्यात आला आहे. मंत्री नरहरी झिरवळ यांना सुरुचि–०९ बंगला देण्यात आला आहे. मंत्री संजय सावकारे यांना अंबर–३२ हा बंगला देण्यात आला आहे. मंत्री संजय शिरसाट यांना अंबर–३८ बंगला देण्यात आला आहे. मंत्री प्रताप सरनाईक यांना अवंती–५ हा बंगला देण्यात आला आहे. मंत्री भरत गोगावले यांना सुरुचि–०२ हा बंगला देण्यात आला आहे. तर मंत्री मकरंद पाटील यांना सुरुचि–०३ हा बंगला देण्यात आला आहे. यावेळी शिंदेंच्या मंत्र्यांनी मात्र बंगले वाटपात नाराजी व्यक्त केली आहे. भाजपच्या मंत्र्यांना बंगले आणि आम्हाला फ्लॅट दिले असल्याचे म्हटले आहे.

**दालनांचेही वाटप**

बंगले वाटपासह मंत्र्यांना दालनाचेही वाटप करण्यात आले आहे. यात चंद्रशेखर बावनकुळे यांना पहिल्या मजल्यावर दालन क्र. १०१, १०१ (अ), १०१ (ब), १०४ ते १०८, मंत्रालय विस्तार, राधाकृष्ण विखे पाटील– दालन क्र. ५०४, ५०६, ५०८, ५ वा मजला विस्तार इमारत, पंकजा मुंडे यांना मुख्य इमारतीत दालन क्र. ४०३, (उत्तर बाजू) ४ रा मजला, धनंजय मुंडे यांना विस्तार इमारतीत २ रा मजला– दालन क्र. २०१, २०२, २०४, २१२, अतुल सावे–मुख्य इमारत–दालन क्र. ५०१, दक्षिण बाजू, ५ वा मजला, संजय सिरसाट–विस्तार इमारत–दालन क्र. ७०३, ७०४, ७०५, ७०४(अ), ७१०, ७ वा मजला, मेघना बोर्डीकर–विधान भवन दालन क्र. १२५, १३० ए व सी तात्पुरती व्यवस्था, बाबासाहेब पाटील –विस्तार इमारत–५ वा मजला, दालन क्र. ५०१, ५०२ यासह इतर मंत्र्यांनाही दालनाचे वाटप करण्यात आले आहे.

------------.

### भुजबळ घेणार

ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी मंत्री असताना सुध्दा मराठा आंदोलक मनोज जरांगे यांना अंगावर घेतले होते. राज्यात ओबीसी चळवळ उभी केल्याने मराठा समाजाच्या रोषाचा सामना सुध्दा करावा लागला होता. पुढे विधानसभा निवडणुकीत ओबीसी समाज महायुतीच्या बाजुने राहील्याने मविआला मोठा फटका बसला. राज्यात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्याने भुजबळ मंत्री होतील असे वाटत असताना त्यांना वगळण्यात आले. त्यामुळे ते कमालीचे नाराज असून त्यांनी सोमवारी मुख्यमंत्र्यांची भेट घेत बराच वेळ चर्चा केली. या भेटीत नेमकी चर्चा काय झाली हे भुजबळांनी माध्यमांना सांगितले. महायुतीच्या विजयात ओबीसी समाजाचा मोठा वाटा असल्याचे फडणवीसांनी मान्य केल्याचे ते यावेळी म्हणाले. तसेच येणाऱ्या आठ दिवसात पुन्हा एकदा भेटून मार्ग काढू असे भुजबळांनी सांगितले आहे. दरम्यान भुजबळ हे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची लवकरच भेट घेणार असून त्यानंतरच पुढील दिशा काय ठरवायची याचा भुजबळ निर्णय घेणार असल्याचे समजते.

---------------

### ५ वी आणि ८ वीला नापास

वार्षिक परीक्षेत नापास होणारे विद्यार्थी नापास होणार आहेत. त्यातल्या त्यात अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना एक दिलासा देण्यात आलाय. तो म्हणजे २ महिन्यांत त्यांना पुन्हा परीक्षा देण्याची संधी दिली जाणार आहे. परंतु ते पुन्हा अनुत्तीर्ण झाल्यास त्यांना पदोन्नती दिली जाणार नाही, असेही केंद्रीय शिक्षण मंडळाने स्पष्ट केले आहे. शाळा आठवीपर्यंत विद्यार्थ्याला बाहेर काढणार नाही. मुलांमधील शिक्षणाचा परिणाम सुधारण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने हा निर्णय घेतला असल्याची माहिती केंद्रीय शिक्षण विभागाचे सचिव संजय कुमार यांनी दिली आहे.

--------------

### दलित असल्यानेच

उत्तर देताना सोमनाथ सूर्यवंशी यांनी मला कुठलीही मारहाण झालेली नाही, असे न्यायाधीशांसमोर सांगितल्याचे फडणवीसांनी म्हटले होते. आता, राहुल गांधी यांनी भेट दिल्यानंतर थेट देवेंद्र फडणवीसांनाच लक्ष्य केले आहे, तसेच फडणवीस खोटं बोलत असल्याचेही ते म्हणाले. मी आज सुर्यवंशी कुटुंबीयांची भेट घेतली, ज्यांना मारहाण झाली त्यांचीही भेट घेतली. मला त्यांनी पोस्टमार्टम रिपोर्टस दाखवले, व्हिडिओ दाखवले, त्यावरुन ही १०० टक्के न्यायालयीन मृत्यू आहे, पोलिसांनीच त्यांची हत्या केली आहे. मुख्यमंत्र्यांनी विधानसभेच्या सभागृहात पोलिसांना मेसेज देण्यासाठी खोटं बोलले आहेत, असे म्हणत राहुल गांधींनी थेट देवेंद्र फडणवीस यांच्यावरच हल्लाबोल केला. सोमनाथ सुर्यवंशी हे दलित आहेत, ते संविधानाचे रक्षण करत होते म्हणून त्यांची हत्या करण्यात आली. ज्या लोकांनी हे केले आहे, त्यांना शिक्षा व्हावी, अद्यापपर्यंतच्या कारवाईवर मी संतुष्ट नाही. हे कुठलेही राजकारण नाही, जिम्मेदार विचारधार आहे, मुख्यमंत्र्यांनी स्टेटमेंट दिले आहे. त्यामुळे, मुख्यमंत्री जबाबदार आहेत, असे म्हणत राहुल गांधींनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य केले. दरम्यान, खासदार राहुल गांधी यांनी मयत सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर सोमनाथ सूर्यवंशी यांच्या आई वत्सलाबाई सूर्यवंशी यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

---------------

### लातूर येथील राज्यस्तरीय मुख्याध्यापक शैक्षणिक संमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे -प्राचार्य जे .एम . पैठणे

बीड । प्रतिनिधी

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.२८ आणि २९ डिसेंबर रोजी लातूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलनास (वार्षिक अधिवेशन) अधिवेशनासाठी बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त मुख्याध्यापक व प्राचार्य यांनी सहभागी व्हावे असे आवाहन मराठवाडा मुख्याध्यापक संघाचे विभागीय सचिव तथा जिल्हाध्यक्ष प्राचार्य जे.एम.पैठणे यांनी केले आहे.

अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळाचे ६१ वे राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलन ( वार्षिक अधिवेशन) लातूर शहरातील औसा रोड येथील थोरमोटे लॉन्स येथे दिनांक २८ व २९ डिसेंबर २०२४ रोजी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शिक्षणमंत्री तसेच वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत होणार आहे. या अधिवेशनात तज्ञांची व्याख्याने व विविध विषयावर प्रश्नावर शोधनिबंध सादर केले जाणार आहेत. तरी या अधिवेशनासाठी बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त मुख्याध्यापक/ प्राचार्य बंधू–भगिनींनी उपस्थित राहून शासन स्तरावर प्रलंबित विविध शैक्षणिक प्रश्नांची सोडवणूक होण्यासाठी मुख्याध्यापक संघटनेची एकजूट दाखवावी असे आवाहन (विभागीय सचिव मराठवाडा मुख्याध्यापक संघाचे विभागीय सचिव तथा जिल्हाध्यक्ष प्राचार्य जे.एम.पैठणे,विष्णुपंत रसाळ सर (जिल्हा सचिव बीड जिल्हा मुख्याध्यापक संघ) , मार्गदर्शक भाऊसाहेब बोबडे सर , उपाध्यक्ष शंकर पवार , गणेश घोडके, सहसचिव विनयकुमार केंडे , कोषाध्यक्ष आप्पासाहेब येवले , सहकोषाध्यक्ष रमेशसिंह देसुरकर , सदस्य भीमराव सावंत , प्रदीप गाडे दादासाहेब खोले, गोविंद चव्हाण ,राजाभाऊ घुंबार्डे , अरुण शेप , सुनील कांबळे, सौ . सरला बिंदू , तालुकाध्यक्ष बीड लक्ष्मण इंगोले, गेवराई भक्तराज पौळ ,शिरूर अभिमन्यू घरगिने , वडवणी दत्तात्रय कानडे ,आष्टी राजू आजबे, अंबाजोगाई विलास सोमवंशी , परळी बळवंत चव्हाण , पाटोदा विकास वराट , माजलगाव लक्ष्मण जगताप ,केज सुशील कुमार गायकवाड आणि तालुका सचिव बीड अनिल काळे, गेवराई कल्याण राऊत , शिरूर बाबुराव जायभाये ,वडवणी धुराजी राऊत ,आष्टी तुकाराम डोके , अंबाजोगाई धनंजय शिंदे, परळी रमेश गीते ,पाटोदा अशोक पवार , माजलगाव चंद्रशेखर तौर, केज दिगंबर नागरगोजे यांच्यासह बीड जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सर्व सदस्य यांनी केले आहे.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार, दि.२४ डिसेंबर २०२४



## सोहम लांगोरे व श्रेयस शिंदे याचे बुद्धिबळ स्पर्धेत नेत्रदीपक यश

**बीड । प्रतिनिधी**

पाथर्डी येथे संपन्न झालेल्या दोन दिवशीय खुल्या राज्यस्तरीय स्पर्धेत बीडचा चि.सोहम अतुल लांगोरे याने १५ वर्षाखालील वयोगटामध्ये ७ पैकी ६.५ गुण घेत ७ पैकी ६ सामने जिंकून एका सामन्यात बरोबरी करत अपराजित राहून दुसरा क्रमांक पटकावला.तसेच बीड येथील चि.श्रेयस अनिल शिंदे याने देखील १२ वर्षे वयोगटाच्या आतील स्पर्धेत पाचवा क्रमांक मिळवत यश संपादन केले. आनंद चेस क्लब आयोजित खुल्या राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा दि. २१ ते २२ डिसेंबर यादरम्यान झालेल्या प्रतिवार्षिक व तीस वर्षाच्या अखंडित असलेल्या स्पर्धेचे कुशल मार्गदर्शक डॉ.विनय कुचेरिया हे करत आहेत यामध्ये एकूण १६८ खेळाडूंनी सहभाग घेतला होता ज्यात २८ आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त खेळाडू खेळत होते.

या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. बुद्धिबळ प्रशिक्षक श्री.दत्तात्रेय क्षीरसागर व श्री. रामप्रसाद शेंडगे यांचे त्यांना विशेष मार्गदर्शन लाभले.बीड शहरातील प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉ. विजय मोहनराव कट्टे यांच्या हस्ते यशस्वी खेळाडूंचा काल सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सोहम अतुल लांगोरे, श्रेयस अनिल शिंदे,अभिनव नितीन राऊत, आदित्य बाळू घुगे, विश्व संजय होळकर व कु.वेदा विजय कट्टे हे विद्यार्थी व प्रशिक्षक उपस्थित होते.

# धारूर ग्रामीण रुग्णालयात अद्यावत सुविधा उपलब्ध करणार -जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

धारूर येथील ग्रामीण रुग्णालयात विवीध प्रकारचे शस्त्रक्रीया शिबीराचे आयोजन . जिल्हा शल्य चिकित्स डॉ. अशोक थोरात , याचे उपस्थीतीत २३डिंसेबर रोजी करण्यात आले होते विवीध प्रकारच्या ३६ शस्त्रक्रिया या शिबीरात करण्यात आल्या हे शिबीर यशस्वी झाले या ग्रामीण रुग्णालयात आत्यावश्यक विवीध सुविधा उपलब्ध करून देण्या साठी आपण प्रयत्नशील असून रुग्णाणा सर्व आत्यावश्यक सुविधा येथे देऊ असे ही . जिल्हा शल्य चिकित्स डॉ. अशोक थोरात यानी शस्त्रक्रीया शिबिर यशस्वी झाल्यावर सागीतले.



धारूर ग्रामीण रुग्नालयात दिनांक २३-१२-२०२४ रोजी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत ग्रामीण रुग्णालय धारूर येथे टंगटाय शत्राक्रिया व कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीर हे जिल्हा शल्य चिकित्स डॉ. अशोक थोरात , जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ उल्हास गंडाळ , निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. एल आर तांदळे , वैद्यकिय अधीक्षक डॉ. बालासाहेब सोळंके , तालुका आरोग्य अधिकारी डॉ.शहाजी लोमटे व आर बी एस के चे समन्वयक आर के तांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.या शिबिरा मध्ये जिल्हा शल्य चिकित्सक डॉ आशोक थोरात यांनी एकूण १७बालकांवर टंगटाय व १८ कुटुंब नियोजन व १ अपेंडेक्स आशा एकून ३६शस्त्रक्रिया यशस्वी केल्या. या कॅम्प साठी ग्रामीण रूग्णालय धारूर येथील वैधकीय अधीक्षक सर्व वैदकीय अधिकारी व सर्व कर्मचारी आरबीएसके चे वैधकीय अधिकारी व कर्मचारी तसेच आयुष वैद्यकीय अधिकारी यांचे अमूल्य सहकार्य लाभले.

हे शस्त्रक्रीया शिबीर यशस्वी झाल्यावर बोलताना . जिल्हा शल्य चिकित्स डॉ. अशोक थोरात यानी येथील रूग्नालयात रुग्नाची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेतली जाईल व हे रुग्णालय पन. नास बेड चे करण्या साठी वरीष्ठ कार्यालया कडे प्रस्ताव पाठवला असून येथे ड्रामा केअर सेंटर ही सुरू करण्या साठी प्रयत्न करू जिल्ह्यातील सर. व प्रतीनियुक्त्या दरद्द केल्या असून लवकरच प्रतीनियूक्ती वरील कर्मचारी व वैद्यकीय अधीकारी येथे रुजू होतील असे ही सागीतले.

### सोयी सुविधा व गैरसोयी दुर करण्यासाठी जिल्हाशल्यचिकीत्सकाना भेटले शिष्टमड़ळ

धारूर ग्रामीण रुग्नालयाचे रजेवर गेलेले वैद्यकीय अधिक्षक याना येथे रुजू करून घेऊनये व येथे गंभिर रुग्नाला रेफर करण्या पेक्षा उपचार करण्याची सुविधा करावी व सर्व शस्त्रक्रीया येथेच कराव्यात कर्मचारी वैद्यकीय अधिकारी याना रुग्णालयात थाबणे बंधनकारक करावे आशी मागणी. जिल्हा शल्य चिकित्स डॉ. अशोक थोरात याचे कडे शिष्टमंडळाने भेटून केली या शिष्टमड़ळात राष्ट्रवादी काग्रैसचे नितिन शिनगारे भाजपाचे मोहन भोसले पत्रकार अतुल शिनगारे, ईश्वर खामकर, विश्वास शिनगारे आदी चा समावेश होता

## आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांची माधव निर्मळ यांच्याकडे सदिच्छा भेट



**दिंद्रुड प्रतिनिधी**

आज महाराष्ट्र राज्याच्या आरोग्य राज्य मंत्री मेघना बोर्डीकर यांनी माजलगाव विधानसभा मतदार संघाचे नेते माधव निर्मळ यांच्या धारूर येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.

नामदार मेघना बोर्डीकर या सोमवारी सायंकाळी मस्साजोग येथील मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी आल्या होत्या. या दौऱ्यात धारूर येथील माधव निर्मळ यांच्या घरी बोर्डीकर यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी अपर्णा व माधव निर्मळ यांच्यासह परिवाराने मेघना बोर्डीकर यांचे राज्यमंत्रीपद मिळाल्याबाबत अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या. अपर्णा निर्मळ या मेघनाताई बोर्डीकर यांच्या मतदारसंघातील झरीबोरी या गावचे आहेत. दोघींचेही मैत्रीचे संबंध असल्याने ही भेट होती असे सांगण्यात येते. माधव निर्मळ यांनी धारूर येथील ग्रामीण रुग्णालयात कायमस्वरूपी वैद्यकीय अधीक्षक व रुग्णालयासाठी वाढीव खाटांची मागणी याप्रसंगी नामदार मेघनाताई बोर्डीकर यांना केली. या प्रसंगी राजेभाऊ निर्मळ, अक्षय मुंदडा, जिल्हा चिकित्सालय प्रमुख डॉ अशोक थोरात, सुरेश भुमरे, बाळासाहेब गायकवाड, राजू शेठ कोमटवार, महादेव शिनगारे, सादिक इनामदार, अनिलराव शेळके, महादेव शेळके, शिवाजी काळे, रंजीत रूपनर , प्रकाश जाडकर, सोरभ निर्मळ उपस्थित होते.

## प्रशिका रोडे यु.के.जी तर यशश्री दहिफळे यांनी प्रथम वर्ग स्पर्धेत केले यश संपादन

परळी । प्रतिनिधी

फॉऊंडेशन स्कूलला पंचवीस वर्षापासून विद्यार्थी व विद्यार्थिनी उज्वल गुणवत्ता यादीत तालुकास्तरीय, विभागीय, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रिडा स्पर्धेच्या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करत आहे. माध्यमिक वर्गातील राष्ट्रीय स्तरावर यावर्षीत विद्यार्थी व विद्यार्थिनी नाव गाजविले आहे. त्याचाही भव्यदिव्य वार्षिक स्नेहसंमेलनात सत्कार करण्यात येणार आहे. याबाबतीत सचिव यांना नियोजित बैठक घेऊन जाहीर करण्यात आले आहे. फॉऊंडेशन स्कूलचे स्नेहसंमेलन जानेवारी महिन्यात भव्यदिव्य आयोजन करण्यात आले आहे. या स्नेहसंमेलन उत्साहात साजरा करण्यासाठी फॉऊंडेशन स्कूलचे प्राचार्य श्री. गजानन नागझरे ( सर ) यांच्यावर मोठी जबाबदारी असुन नर्सरी ते माध्यमिक शिक्षणांना विविध क्षेत्रातील स्पर्धा घेण्यात आलेल्या त्यांचे नियोजन शिक्षक व कर्मचारी यांना सुचना सुध्दा दिल्या. शैक्षणिक , सांस्कृतिक, क्रिडा क्षेत्रातील स्पर्धात विद्यार्थी व विद्यार्थिनी सहभागी झालेल्यांना व प्रथम क्रमांक पटकावला, व्दितीय क्रमांक पटकावला, तसेच तृतीय क्रमांक पटकावला यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. अशी माहिती सूत्रांकडून मिळाली.

# संपादक जितेंद्र सिरसाट यांना धमकी देणाऱ्या त्या महिला कर्मचाऱ्यावर कारवाई करा

**पाटोदा । प्रतिनिधी**

बीड येथील दैनिक वास्तवचे संपादक जितेंद्र सिरसाट यांना बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी असलेल्या आगाव मॅडम नामक महिलेने दूरध्वनीवरून फोन करून धमकी दिली आहे. त्यांना उचलून आणण्याची भाषा केली आहे. या धमकीमुळे बीड जिल्ह्यातील पत्रकारिता क्षेत्रामध्ये खळबळ उडाली आहे.याविरोधात महाराष्ट्रातुन तिव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या असुन या बाबतीत मराठी पत्रकार परिषदेच्या पाटोद्याच्या वतीने घटनेचा तिव्र निषेध व्यक्त करत त्या महिला कर्मचाऱ्यावय कारवाई करण्याची मागणी केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की

जितेंद्र सिरसाट हे मागील पंचवीस वर्षापासून बीड येथे पत्रकारिता करत आहेत. त्यांचे स्वतःचे वास्तव हे दैनिक असून त्या दैनिकाचे ते संपादक आहेत. त्यांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्वसामान्य शेतकरी शेतमजुरांचे प्रश्न मार्गी लावले आहेत. गोरगरिबांना न्याय देण्यासाठी त्यांनी अनेक वेळा आपल्या लेखणीतून आवाज उठवलेला आहे. शासन, प्रशासनाला भानावर आणण्यासाठी त्यांनी आपल्या लेखणीची धार कडक ठेवून प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. मात्र खरी पत्रकारिता करत असताना त्यांनी कधीही आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून कोणालाही जाणीवपूर्वक त्रास दिलेला नाही.



### धमकीमागील सुत्रधाराचा शोध घ्या,पाटोद्यातील पत्रकारांची मागणी

सामाजिक जीवनामध्ये ते अत्यंत सुस्वभावी व्यक्तिमत्व आहेत. प्रत्येक नागरिकांसोबत त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध आहेत. कधीही कोणाला बोलताना मनमिळावू पणाने ते बोलतात. अशा हसतमुख असणाऱ्या पत्रकाराला शासकीय सेवेतील अधिकारी असलेल्या एका महिलेने दूरध्वनीवरून धमकी दिल्याचे ऑडिओ क्लिप ऐकायला मिळाली आहे. जितेंद्र सिरसाट यांना सदर महिला अर्वाच्च भाषेत बोलत असताना जितेंद्र सिरसाट त्यांना अत्यंत नम्रपणे बोलत आहेत. तरीही त्यांना धमकी देण्यात आली. जितेंद्र सिरसाट यांच्या सारख्या नामांकित पत्रकाराला जर धमकी मिळत असेल तर बीड जिल्ह्यातील शेकडो पत्रकारांना खूप मोठा धोका आहे. त्यामुळे या बाबीची गंभीर दखल घेऊन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित दादा पवार यांनी तात्काळ दखल घ्यावी आणि या बाबीची सखोल चौकशी करून या प्रकरणात नेमकं सदर महिलेच्या पडद्याआडून कोण कोण चेहरे आहेत याचा शोध घ्यावा असे नमूद केले आहे.मागणीचे निवेदन पाटोदा तहसील कार्यालय प्रतिनिधी जाधव मॅडम व पाटोदा पोलीस सहाय्यक निरीक्षक संभाजी तागड यांच्या मार्फत प्रशासनाला देण्यात आले.या निवेदनावर किरण शिंदे पाटील,हल्ला कृती समितीचे तालुकाध्यक्ष संजय सानप, मराठी पत्रकार परिषद तालुकाध्यक्ष अजय जोशी,कार्याध्यक्ष सोमिनाथ खंडागळे, तालुका उपाध्यक्ष अशोक भवर, जावेद शेख, सचिव हमीदखान पठाण, सतिष गर्जे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

पान ६ वरून...

### रंजना भावसार जायंट्स

आदिंचा समावेश आहे .

या फेडरेशन चे नुकतचे संभाजीनगर येथे वार्षिक अधिवेशन संपन्न झाले या अधिवेशनात नाशिक येथील सामाजिक कार्यकर्त्या तथा अखिल भारतीय भावसार क्षत्रिय महासभा महिला परिषदेच्या महाराष्ट्र राज्य सचिव रंजना भावसार यांचे या वर्षातील अत्यंत प्रशंसनीय कार्य झाले असल्याने त्यांना फेडरेशन अध्यक्ष प्रशांत मालानी यांच्या हस्ते तर संभाजीनगरच्या उप जिल्हाधिकारी अंजली धानोरकर, स्पेशल कमिटी मेंबर सुर्यमाला मालानी , विनोद शेवतेकर,संजय गुगळे, सचिव पल्लवी जोशी नाशिक प्राईड चे सचिव अनिरुद्ध जाजु आदि मान्यवरांच्या उपस्थितीत तर पास्ट प्रेसिडेंट राजेंद्र चव्हाण,नरेश गुप्ता, डॉ गुरुदत्त राजपूत, डॉ संजय नाफाडे, रत्नाकर महाजन यांच्या विशेष उपस्थितीत स्मृती चिन्ह देऊन सन्मानित करत हा पुरस्कार देण्यात आला. संभाजीनगर येथे झालेल्या त्या वर्षे २०२३च्या जायंट्स ग्रुप ऑफ नाशिक स्टार या ग्रुप च्या अध्यक्ष पण भुषविले आहे. रंजना भावसार यांचे सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात भरीव योगदान आहे. रंजना भावसार यांना जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन, फेडरेशन दोन चा उत्कृष्ट युनिट डायरेक्टर पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे मित्र, मैत्रीण, नातेवाईक, समाज बांधव तसेच सर्व स्तरातून त्यांच्या वर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### राज्यस्तरीय ओवी ज्ञानेशाची

आदी मान्यवर उपस्थित होते.या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्यात कु.समृद्धी पटवा यांना प्रशस्तीपत्र, ज्ञानेश्वरी ग्रंथ आणि रोख रक्कम ३००० रुपये देऊन सत्कार करण्यात आला.तसेच ऍड.अनंत कुलकर्णी यांचेकडून ही विशेष पारितोषिक देण्यात आले.यावेळी अँड.येवले अँड.अनंत कुलकर्णी,अँड.एन.एन. साबळे,अँड.नन्नवरे साहेब, अँड भगत,अँड.शेकडे,अँड पोकळे ,डॉ. राजेश तांदळे, व उत्तम वक्ते देविदास महाराज खिळदकर त्याचबरोबर कार्यक्रमाचे आयोजक अँड.बोडखे व त्यांचा संपूर्ण परिवार आणि सर्व परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## श्रीमती गो.कुं.यो.कन्या विद्यालयाचा सुवर्ण महोत्सव वर्षाचा सांगता समारंभ

### मराठी अभिनेत्री चिन्मयी सुमीत यांची उपस्थिती

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित श्रीमती गोदावरीबाई कुंकूलोळ कन्या विद्यालयाच्या सुवर्ण महोत्सव वर्षाचा सांगता कार्यक्रम शनिवार २८ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आल्याची माहिती विद्यालयाच्या वतीने देण्यात आली आहे.




मुख्य कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून प्रख्यात मराठी अभिनेत्री चिन्मयी सुमीत या उपस्थित राहणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर हे असतील. सकाळी साडे आठ वाजता पू.स्वामी रामानंद तीर्थ स्मृति स्थळ ते विद्यालय परिसर शोभायात्रा तर दुपारच्या सत्रात गुणवंत विद्यार्थिनी गौरव, मुलाखती व सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभाग प्रमुख/संचालिका प्रा.डॉ.जयश्री मोटेगांवकर ह्या तर समन्वयक म्हणून विभाग प्रमुख/ संचालिका ऍड. कल्याणी विर्धे आणि साधना कुंकूलोळ, मधुवंती साने,डॉ.क्षमा देवशटवार,अपेक्षा कसबे आदी पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत.

विद्यालयाच्या माजी विद्यार्थीनींनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष गणपत व्यास, कार्यकारी उपाध्यक्ष ऍड.जगदीश चौसाळकर,सचिव कमलाकर चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ.शैलेश वैद्य,सहसचिव प्रा. भीमाशंकर शेटे व सर्व शालेय पदाधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# १७ लाखाच्या चोरीतील फरार आरोपीला बीडला पकडले

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील मार्केट यार्ड परिसरात ३१ डिसेंबर २०२३ रोजी रात्री सशस्त्र दरोडेखोरांनी व्यापाऱ्याच्या डोक्याला गावठी कट्टा लावत १७ लाख रुपये (पोलीस दप्तरी ९ लाख ५० हजार रुपयाची नोंद आहे याप्रकरणी

स्थानिक गुन्हे शाखेने यापुर्वी दि. ७ सप्टेंबर रोजी रात्री एकाला अटक केली होती तर त्याचा साथीदार तेंव्हापासून फरार होता. अखेर तो बीड येथील नवगण राजुरी भागात असल्याची माहिती मिळाल्याने त्याला जालना पोलिसांन अटक केली आहे. या गुन्ह्यात वापरलेली कार जप्त करण्यात आली.

याविषयी अधिक माहिती अशी की, नवीन मार्केट यार्डातील मोहन एजन्सी या दुकानाचे मालक आशिष अग्रवाल यांच्या डोक्याला गावठी कट्टा लावून ५-६ जणांच्या टोळीने १७ लाख

किंमती सामान लंपास केले होते. या प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला होता. पोलिसांनी काही महिन्यांपुर्वीच या गुन्ह्यात जालन्यातून शेख आसेफ यास अटक करीत ५० हजार रुपये जप्त करण्यात आले होते.

माहितीनुसार कृष्णा भिवराव राजुरी, जि. बीड) यास जेरबंद करीत त्याच्या ताब्यातुन कार (एमएच ०४- एचएफ २८६९) जप्त केली होती. तर आरोपी कृष्णा बहिर याला पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले होतेयान्ह्यातील आरोपींचा घडल्यापासून फरार होता. तो नुकताच बीड जिल्ह्यातील नवगण राजुरी येथील बहीर गल्ली येथे आला असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ बीड गाठून श्रावण पवार याला ताब्यात घेण्यात आला आहे .

# डॉ. द्वारकादास लोहिया लोकसहभाग पुरस्कार वितरण व राष्ट्रीय जल परिषदचे आयोजन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

पू. साने गुरुजी यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त आणि डॉ द्वारकादास लोहिया (बाबूजी) यांच्या स्मरणार्थ मराठवाडा नवनिर्माण लोकायत (मानवलोक) व मानवलोक समाजकार्य महाविद्यालय अंबाजोगाई जिल्हा बीड यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. द्वारकादास लोहिया (बाबूजी) लोकसहभाग पुरस्कार वितरण व राष्ट्रीय जल परिषदचे आयोजन २४ डिसेंबर २०२४ मंगळवार रोजी, मानवलोक समाजकार्य महाविद्यालय रिंग रोड अंबाजोगाई जिल्हा बीड येथे करण्यात आले आहे.

सकाळी ठीक १०.०० वाजता राष्ट्रीय जल परिषद चे उद्घाटन केज मतदार संघाच्या विद्यमान आमदार नमिता अक्षय मुंदडा यांच्या हस्ते होणार असून या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मा श्री दत्ता देशकर (संपादक मासिक जलसंवाद पुणे ), अध्यक्ष म्हणून श्री अशोकराव देशमुख (अध्यक्ष मानवलोक अंबाजोगाई ) यांची उपस्थिती आहे.

राष्ट्रीय जल परिषदेचे आयोजन एकूण चार सत्रात केले असून या चार सत्रामध्ये मुख्य विषय मराठवाड्यातील दुष्काळमुक्तीसाठी लोकसहभाग हा घेऊन दुष्काळमुक्तीसाठी स्वयंसेवी संस्थाचे योगदान ,सामान्यायी पाणी वाटप संकल्पना ,मराठवाड्यातील नदी खोऱ्याची स्थिती आणि दुष्काळ ,मराठवाड्यातील भूरचना आणि सिंचन ,ग्रामविकासातील जलसंधारण आणि महिलांचा सहभाग ,जल व्यवस्थापनातील लोकसहभाग आणि सिंचन व्यवस्था, नवीन शैक्षणिक धोरण आणि दुष्काळ मुक्ती ,जल प्रदूषणावरील नैसर्गिक उपाय ,आणि दुष्काळ शेती सिंचन व लोकसहभाग या उप विषयावर प्रकाश टाकून सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.

पहिल्या सत्रात १०:४५ ते ११:४५ च्या दरम्यान मराठवाड्यातील नदी खोरे व भूरचना या विषयावर चर्चा होणार असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुमंत पांडे (भूतपूर्व कार्यकारी संचालक जलसाक्षरता केंद्र यशदा पुणे), तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. श्रीनिवास वडगबाळकर प्राचार्य (से.मी) दयानंद महाविद्यालय सोलापूर, तसेच रोहन पवार ( वरिष्ठ भू-वैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, बीड) यांचे मार्गदर्शन होणार आहे.

दुसरे सत्र सकाळी ११:४५ ते दुपारी १ वाजता होणार असून जल व्यवस्थापन व महिलांचा सहभाग या विषयावर मार्गदर्शन करण्यात येणारा आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय सिंग व जल सहेली टीम (अध्यक्ष- परमार्थ संस्था बुंदेलखंड झांसी, उत्तरप्रदेश) तर प्रमुख मार्गदर्शक मेधा जोशी ( सल्लागार तथा अभ्यागत प्राध्यापक यशदा, पुणे) तसेच अश्विनी कुलकर्णी (प्रगती अभियान, नाशिक) या मार्गदर्शन करणार आहेत. सत्र तिसरे दुपारी २ ते ३ यादरम्यान होणार असून जल व्यवस्थापनातील लोकसहभाग आणि सिंचन व्यवस्था या विषयावर मार्गदर्शन होणारा असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अजित गोखले (शास्त्रज्ञ तथा संस्थापक नॅचरल सोल्युशन, पुणे), आणि मार्गदर्शक म्हणून डॉक्टर प्रदीप भलगे ( प्रोफेसर सिविल इंजिनिअरिंग डिपार्टमेंट हायटेक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी वाळूज छ. संभाजीनगर (औरंगाबाद ), तसेच शरद घुगे (संस्थापक - जय मल्हार सिंचन सहकारी संस्था, इंदोरे तालुका दिंडोरी जिल्हा नाशिक) यांचे मार्गदर्शन होणार आहे. चौथ्या सत्रात शाश्वत विकास: जलसमृद्ध गाव या विषयावर मार्गदर्शन करण्यात येणार असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. मलिन्नाथ कलशेट्टी (भा.प्र.से संचालक- राज्य ग्रामीण विकास संस्था यशदा पुणे) प्रमुख मार्गदर्शक डॉ. आनंद पुसावळे ( कार्यकारी- संचालक जलसाक्षरता केंद्र यशदा ,पुणे )यांचे मार्गदर्शन झाल्याच्या नंतर दुपारी ३:४५ वा. डॉ. द्वारकादास लोहिया (बाबूजी) लोकसहभाग पुरस्कार वितरण संजय सिंग (अध्यक्ष- परमार्थ संस्था बुंदेलखंड झांसी उत्तर प्रदेश) यांच्या शुभ हस्तेसत्कारमूर्ती कृषी भूषण तथा जलतज्ञ मा. विजय (अण्णा) बोराडे ( सचिव मराठा शेती सहाय्यक मंडळ जालना) यांचा लोकसहभाग पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. मलिन्नाथ कलशेट्टी (भा.प्र.से संचालक- राज्य ग्रामीण विकास संस्था यशदा पुणे) तसेच प्रमुख अतिथी म्हणून डॉ. राजेंद्र सिंह (भाईजी) जलपुरुष, राजस्थान, यांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. तरी महाराष्ट्रातील व मराठवाड्यातील तसेच बीड जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते, महिला, पुरुष व जल अभ्यासक तसेच विद्यार्थी यांनी कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्री अनिकेत लोहिया(कार्यवाह मानवलोक श्री ालासाहेब आगळे (सहकार्यवाह- मानवलोक ),डॉ. प्रकाश जाधव (प्राचार्य- मानवलोक समाजकार्य महाविद्यालय , अंबाजोगाई) डॉ. हनुमंत साळुंके (समन्वयक राष्ट्रीय जलपरिषद) तसेच सर्व मानवलोकचे संस्थेचे कार्यकारणी सदस्य ,कार्यकर्ते व मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाचे प्राध्यापक , शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले आहे.

### तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अंबड, जि. जालना

**कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक: ०२४८३-२७५०२६,जा.क्र.२०२४/ सेतु/कावि-१५७३**

Email ID : tahsildarambad@gmail.com दिनांक:-०२/११/२०२४

**अंकुश सखाराम ढोकळे रा. गोंदी**

**विरुध्द**

**ग्रामपंचायत कार्यालय नगर परिषद गोंदी ता.अंबड**

विषयः- कलम १३(३) जन्म मृत्यू नोंदणी कायदा प्रमाणे जन्म-मृत्यू प्रमाणपत्र मिळणेबाबत तलाठी /ग्रामसेवक मधील जाहीर प्रगटण करणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार नामे अंकुश सखाराम ढोकळे रा. गोंदी ता.अंबड जि. जालना येथील राहिवाशी असुन अर्जदार सखाराम कोंडीराम ढोकळे यांची वडील त्यांनी जन्म-मृत्यु ची याची मृत्यू दि.२२/१२/२००८, कोंडीराम धोंडीराम ढोकळे यांची आजोबा त्यांनी जन्म-मृत्यु ची याची मृत्यू दि.१०/०५/२००४ रोजी गोंदी असल्याचे अर्जात नमूद केले असुन त्या अनुशंगाने त्यांनी मृत्यू प्रमाणपत्र आदेश मिळण्यासाठी त्यांनी या न्यायालयात / अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी, सदर जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते कि. जन्म मृत्यू नोंद बाबत कोणाचाही कोणताही अक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत लेखी स्वरूपात अक्षेप सादर करावा जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप या कार्यालयास प्राप्त झाला नाही तर संबधित प्रकरणात कायदयाप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०२/१२/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले जाते.

स्वाक्षरित

**तहसिलदार अंबड**

# बीआरसीकडून ८ नवीन पिकांचे वाण विकसित

## शेतकऱ्यांसाठी तांदूळ, तीळाच्या वाणांची निर्मिती

शेतीचा कायापालट करण्यासाठी, शेतकऱ्यांचे उत्पन्न सुधारण्यासाठी, पिकांची लवचिकता वाढवण्यासाठी भाभा अणुसंशोधन केंद्राने (बीएआरसी) विविध कृषी विद्यापीठांच्या सहकार्याने व्यावसायिक लागवडीसाठी आठ नवीन पिकांचे वाण विकसित केले आहेत. यात ५ तृणधान्ये आणि ३ तेलबियांच्या वाणांचा समावेश आहे. ने ७० वर्षांच्या कारकिर्दीमध्ये आतापर्यंत ७० पीक जाती शेतकऱ्यांसाठी विकसित केल्या आहेत. याचा शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

कोणते वाण केले विकसीत?

दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या सहकार्याने महाराष्ट्राच्या किनारपट्टी भागातील क्षार जमिनीसाठी 'ट्रॉम्बे कोकण खारा' हे तांदळाचे वाण विकसित केले आहे. या वाणामुळे खाऱ्या मातीमध्ये भातशेती करणे शक्य होणार असून भाताचे उत्पादन १५ टक्क्यांनी वाढण्यासही मदत होणार आहे. रायपूरमधील इंदिरा गांधी कृषी विद्यापीठाच्या सहकार्याने छत्तीसगडमधील शेतकऱ्यांसाठी 'बौना लुचाई-सीटीएलएम' आणि 'संजीवनी' हे तांदळाचे दोन वाण विकसित केले आहेत. राजस्थानच्या



शुष्क परिस्थितीत चांगले उत्पादन मिळावे, यासाठी उष्णता सहन करणारे आणि बुरशीजन्य रोगांना प्रतिरोधक असलेली 'ट्रॉम्बे जोधपूर गहू-१५३' ही जात जोधपूर कृषी विद्यापीठाच्या सहकार्याने विकसित करण्यात आली आहे. 'ट्रॉम्बे राज विजय गहू १५५' ही जात मध्य प्रदेशमधील ग्वाल्हेरमधील राजमाता विजयाराजे सिंधिया कृषी विद्यापीठाच्या सहकार्याने विकसित केली. बीएआरसीद्वारे गव्हाचे वाण विकसित करण्याची ही पहिलीच वेळ आहे.

तेलबियांचं उत्पादन वाढवण्यासाठी प्रयत्न

देशांतर्गत उत्पादनातून ४० ते ४५ टक्के तेलबियांची गरज भागवली जाते. तेलबियांच्या उत्पादनात 'आत्मनिर्भरता' साध्य करण्यासाठी मोहरी, तीळ आणि भुईमुगाचे उच्च उत्पन्न देणारे सुधारित वाण बीएआरसीने विकसित केले आहे. परभणीतील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या सहकार्याने गामा किरण विकिरण वापरून प्रथमच तीळाची 'ट्रॉम्बे लातूर तीळ-१०' ही जात विकसित केली आहे. यातून सुमारे २० टक्के अधिक उत्पन्न मिळणार आहे. राजस्थानसाठी जोधपूर कृषी विद्यापीठाच्या सहकार्याने 'ट्रॉम्बे जोधपूर मस्टर्ड २' ही सध्याच्या वाणांपेक्षा १४ टक्के अधिक उत्पादन देणारे वाण विकसित करण्यात आले आहे. यात तेलाचे प्रमाण ४० टक्के आहे. रायपूरमधील इंदिरा गांधी कृषी विद्यापीठाच्या सहकार्याने 'ट्रॉम्बे ग्राउंडनट ८८' हे भुईमुगाचे नवे वाण विकसित केले आहे. त्याला 'छत्तीसगड ट्रॉम्बे मुंगफली' असेही नाव दिले आहे. हे वाण छत्तीसगडमध्ये पावसाळी व उन्हाळी हंगामात लागवडीसाठी योग्य आहे.ी

# पॉलिहाऊसमध्ये गुलाबाची लागवड



जर तुम्ही फळे आणि भाज्यांची लागवड करून कंटाळा करत असाल तर फळे आणि भाजीपाला व्यतिरिक्त गुलाबाची लागवड करून शेतकरी भरघोस नफा कमवू शकतात. शेतकरी पॉलिहाऊसमध्ये डच गुलाबाची लागवड करू शकतात. या फुलाचे वेगळेपण आहे, तज्ज्ञांच्या मते, या फुलाचा रस उसाच्या रसापेक्षा कितीतरी पटीने गोड असतो.

यासोबतच बाजारातही भरपूर मागणी आहे. या फुलाचा वापर सजावटीसाठीही केला जातो. या फुलाची लागवड शेतकऱ्यांचे नशीब बदलू शकते. पॉलिहाऊसमध्ये या फुलाच्या लागवडीसाठी अनुदानही उपलब्ध आहे. तज्ज्ञांच्या मते, एक एकरमध्ये पॉलीहाऊस उभारण्यासाठी सुमारे ७० लाख रुपये खर्च येतो. ज्यावर राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाकडून ५० टक्के अनुदान दिले जाते. या फुलाची लागवड फक्त पॉलीहाऊसमध्येच केली जाते. डच गुलाब वाढवण्यासाठी, पॉलीहाऊसमध्ये सुमारे ३२-३५ अंश सेल्सिअस तापमान असणे आवश्यक आहे. हिवाळ्यात पिकाची काढणी करणे फायदेशीर ठरते. डच गुलाबांना भारताबरोबरच जपान, नेदरलँड आणि ऑस्ट्रेलियासारख्या देशांमध्ये मागणी जास्त आहे.

शेतकरी हे फूल पिकवून परदेशात पुरवठा करू शकतात. केवळ एक एकर शेतात दररोज ४५ ते ५० किलो गुलाबाची फुले येतात. जी चांगल्या किमतीत विकली जाते. या फुलाची लागवड करून शेतकरी बांधवांना दररोज १० ते २० हजार रुपयांचा नफा मिळू शकतो. राष्ट्रीय फलोत्पादन मंडळ देखील फुलांच्या उत्पादनावर उत्कृष्ट अनुदान देते. रशिया आणि युक्रेनच्या युद्धामुळं महागाईचा भडका उडाला. भारतातील भल्याभल्यांचं तर कंबरडं मोडलंच, सोबतच प्रत्येक व्यक्तीला प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आजही याची झळ सोसावी लागत आहे. पण रशिया-युक्रेनच्या युध्दामुळं पुण्याच्या मावळमधील मुकुंद ठाकरेंना कमालीचा फायदा झाला आहे. गुलाबातून त्यांनी चांगली कमाई केली आहे.

# जीवाणू खते - पीक संरक्षण व उत्पादन वाढीसाठी किफायतशीर आणि परिणामकारक पर्याय

रासायनिक खताची कमतरता आणि वाढलेल्या किंमती यामुळे पिकांचे उत्पादन खर्च तर वाढतेच शिवाय अतिरिक्त रसायनांच्या वापरामुळे पिकांचे सुद्धा नुकसान होते. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातून अपेक्षित उत्पादन मिळवायचे असल्यास जीवाणू खते हा अतिशय किफायतशीर आणि परिणामकारक पर्याय सध्या उपलब्ध आहे.

जीवाणू खतांचे फायदे : जीवाणू खतांमुळे रासायनिक खताचा कार्यक्षम वापर होऊन, त्यात बचत होऊ शकते. पर्यावरणपूरक जीवाणू खते जमिनीचा पोत सुधारतात व पीक उत्पादनात १५ ते २० टक्के वाढ करण्यास मदत करतात. जीवाणू खतांमुळे बियाण्यांची उगवणशक्ती वाढते. जैविक खते सूक्ष्म अन्नद्रव्याबरोबरच जिब्रेलिक ॲसिड, सायटोकायनिन इन्डॉल ॲसिटीक ॲसिड, यासारखी संप्रेरके व विटामीन बी' झाडांना मिळवून देतात. जैविक खतांद्वारे जमिनीत प्रतिजैविके सोडली गेल्याने काही प्रमाणात बुरशीजन्य रोगांचे देखील नियंत्रण होते. जीवाणू खते जमिनीत आढळणाऱ्या उपयुक्त जीवाणूपासूनतयार केलेली असतात. त्यापैकी अझोटोबॅक्टर, ॲझोस्पीरिलम, निळी हिरवी शेवाळे आणि ॲझोला पिकास नत्र पुरवितात. बॅसीलस पॉलिमिक्स जीवाणू स्फुरदाची उपलब्धता वाढवितात तर मायकोराईझा सारखे जीवाणू पिकास स्फुरद, पालाश, नत्र, कॅल्शियम, सोडियम, जस्त, तांबे, यासारखी अन्नद्रव्ये जमिनीतून शोषण करण्यासाठी मदत करतात. यापैकी अझोटोबॅक्टर आणि रायझोबियम ही संवर्धने प्रचलित असून इतर जीवाणू खताच्या अधिक वापरासाठी कृषी खाते व कृषी विद्यापीठे प्रयत्नशील आहेत.

जीवाणू खत (संवर्धन) वापरण्याची पद्धती : अझॅटोबॅक्टर अथवारायझोबियम जीवाणू संवर्धन वापरायचे असल्यास संवर्धनाचे १ पाकिट (२५० ग्रॅम) ५०० लिटर पाण्यात मिसळून केलेले द्रावण बियाण्यांवर शिंपडून हलक्या हाताने चोळावे. जीवाणू संवर्धन लावलेले बियाणे स्वच्छ कागदावर किंवा पोत्यावर सुकवावे आणि लगेच पेरणीसाठी वापरावे. एका पाकीटातील संवर्धन (२५० ग्रॅम)१० ते १५ किलो बियाणांवर प्रक्रिया करण्यासाठी पुरेसे होते. गुळाचे पाणी (५० ते १०० ग्रॅम गूळ + ५०० मिली पाणी) वापरल्यास जास्त परिणामकारक ठरते. उसाची एक एकर लागवण करण्यासाठी ५० लिटर ॲसीटॉबॅक्टरची ८ पाकीटे आणि स्फुरद विद्राव्य जीवाणूंची (पीएसबी) ८ पाकीटे मिसळून द्रावण तयार करुन उसाच्या कांडया या द्रावणामध्ये बुडवून लगेच लावणी करावी. बटाट्याच्या एक एकर लागणाऱ्या बेण्यासाठी अझोटोबॅक्टरची ८ पाकीटे व स्फुरद विद्राव्य जीवाणूंची (पीएसबी) ८ पाकीटे ५० लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करावे व द्रावणात बेणे बुडवून लावणी करावी. हळद, आले (अद्रक) एक एकरा करीता लागणाऱ्या बेण्यासाठी अझोटोबॅक्टरची ८ पाकीटे व स्फुरद विद्राव्य जीवाणूंची (पीएसबी) ८ पाकीटे ५० लिटर पाण्यात मिसळून द्रावणात बेणे बुडवून लागवड करावी. मिरची, तंबाखू, कांदा, फळे आणि भाजीपाला पिकांसाठी ॲझोटोबॅक्टरची १० पाकीटे आणि स्फुरद विद्राव्य जीवाणूंची (पीएसबी) १० पाकीटे २० लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करावे. रोपाची लावणी करते वेळी रोपाची मुळे या द्रावणामध्ये ५ मिनीटे बुडवून नंतर लावणी करावी. ज्वारी पिकास ॲझोस्पीरिलम व स्फुरद विद्राव्य जीवाणू संवर्धनाची आणि हरभरा पिकास रायझोबियम व स्फुरद विद्राव्य जीवाणू संवर्धनाची एकत्रित (२५० ग्रॅम प्रत्येक जिवाणू संवर्धन प्रति १ किलो बियाणास) बिजप्रक्रिया करावी, अशी शिफारस करण्यात येते. सोयाबीन पिकास रायझोबियम व स्फुरद विद्राव्य जीवाणू संवर्धनाची आणि करडईस अझोटोबॅक्टर व स्फुरद विद्राव्य संवर्धनाची (२५० ग्रॅम प्रत्येक जीवाणू संवर्धनाची प्रति १० किलो बियाणास) एकत्रित बिजप्रक्रिया करावी.

जीवाणू संवर्धन वापरतांना घ्यावयाची काळजी : जीवाणू संवर्धने पाकिटावर नमूद केलेल्या पिकांसाठी सूचनेप्रमाणे अंतिम दिनांकापूर्वी वापरावीत. बियाण्यांस बुरशीनाशके किंवा कीटकनाशके अगोदर वापरावीत व त्यानंतर जीवाणू संवर्धन लावावे. जीवाणू संवर्धन अथवा संवर्धनाची प्रक्रिया केलेले बियाणे खतात मिसळू नये. जीवाणू संवर्धन खरेदी करताना वापरासंबंधी अंतिम तारीख तसेच पिकाचे नाव पाहूनच खरेदी करावे व पाकिटास सावलीत थंड जागी ठेवावे. वेगवेगळ्या व्दिदल पिकासाठी वेगवेगळे रायझोबियम वापरावे.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७७७ : कॅप्टन जेम्स कूकने प्रशांत महासागरातील किरितीमती बेटांचा शोध लावला.
१८९२ : भारताचे प्रसिद्ध लेखक बनारसीदास चतुर्वेदी यांचा जन्म.
१८९४ : पहिली वैद्यकीय परिषद कोलकत्ता येथे सुरु झाली.
१९०६ : रेजिनाल्ड फेसेंडेन याने प्रथमच एक कवितावाचन, व्हायोलिनवादन आणि एक भाषण यांचे रेडिओ प्रक्षेपण केले.
१९१० : स्वातंत्र्यवीर सावरकर यांना जन्मठेपेची व काळ्यापाण्याची शिक्षा
१९२४ : अल्बानिया या देशाला स्वातंत्र्य मिळाले.
१९५१ : लिबीया हा देश (ईटलीकडून) स्वतंत्र झाला.
१९७९ : सोविएत युनियनने अफगणिस्तानवर आक्रमण केले.
१९८६ : भारतीय ग्राहक दिन.
१९८६ : दिल्ली येथील लोटस टेंपल भक्तांसाठी उघडण्यात आले होते.
१९८९ : मुंबई मध्ये देशातील पहिले मनोरंजन पार्क 'एस्सेल वर्ल्ड' उघडल्या गेले.
१९९९ : काठमांडू येथून नवी दिल्लीला येणार्या 'इंडियन एअरलाइन्स फ्लाईट ८१४' या विमानाचे तालिबानी अतिरेक्यांनी अपहरण करुन ते विमान अफगणिस्तानातील कंदाहार येथे नेले.
२००० : भारतीय बुद्धीबळ खेळाडू विश्वनाथ आनंद यांनी बुद्धिबळातील वर्ल्ड चैंपियनशिप आपल्या नावावर केली.
२००२ : दिल्लीच्या मेट्रोचा शुभारंभ झाला.
२०१४ : अटल बिहारी वाजपेयी आणि मदन मोहन मालवीय यांना भारतरत्न पुरस्कार देण्याची घोषणा करण्यात आली.
२०१६ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अरबी समुद्रात उभारल्या जाणाऱ्या छत्रपती शिवस्मारकाचे जलपूजन आणि भूमिपूजन करण्यात आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

११६६ : जॉन - इंग्लंडचा राजा (मृत्यू: १९ आक्टोबर १२१६)
१८१८ : जेम्स प्रेस्कॉट ज्यूल - ऊर्जेच्या संक्रमणाविषयी सिद्धांत मांडणारे ब्रिटिश पदार्थ वैज्ञानिक (मृत्यू: ११ आक्टोबर १८८९)
१८८० : डॉ. भोगराजू पट्टाभी सीतारामय्या - स्वातंत्र्यसैनिक, इतिहासकार आणि काँग्रेसचे नेते. काँग्रेसच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त त्यांनी लिहिलेला 'हिस्ट्री ऑफ द इंडियन नॅशनल काँग्रेस' हा ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे. (मृत्यू: १७ डिसेंबर १९५९)
१८९९ : पांडुरंग सदाशिव साने ऊर्फ 'साने गुरूजी' - नामवंत साहित्यिक, बालसाहित्यिक, समाजवादी नेते, समाजसुधारक व स्वातंत्र्यसैनिक. त्यांचे 'श्यामची आई' हे पुस्तक प्रकाशनक्षेत्रातील सर्व विक्रम मोडणारे ठरले आहे. (मृत्यू: ११ जून १९५०)
१९२४ : मोहम्मद रफी - पार्श्वगायक, पद्मश्री (१९६७) (मृत्यू: ३१ जुलै १९८० मुंबई)
१९३० : देशातील प्रसिद्ध लेखिका उषा प्रियंवदा यांचा जन्म.
१९४२ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, नाटककार इंद्र बानिया यांचा जन्म. १९५६: भारतीय चित्रपट सृष्टीचे प्रसिद्ध अभिनेते अनिल कपूर यांचा जन्म.
१९५७ : हमीद करझाई - अफगाणिस्तानचे राष्ट्राध्यक्ष
१९५९ : हिन्दी चित्रपट कलाकार अनिल कपूर यांचा जन्म.
१९८८ : भारतीय क्रिकेट खेळाडू पियुष चावला यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५२४ : वास्को द गामा - पोर्तुगीज दर्यावर्दी. अफ्रिकेला वळसा घालून युरोपातुन भारतात येण्याचा मार्ग त्याने शोधला.
१९६७ : बास्किन-रोबिन्स चे सहसंस्थापक बर्ट बास्कीन यांचे निधन. (जन्म: १७ डिसेंबर १९१३)
१९७३ : पेरीयार ई. व्ही. रामस्वामी - स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक आणि द्रविड चळवळीचे प्रणेते (जन्म: १७ सप्टेंबर १८७९)
१९७७ : नलिनीबाला देवी - आसामी कवयित्री व लेखिका (जन्म: २३ मार्च १८९८)
१९८७ : एम. जी. रामचंद्रन - अभिनेते व तामिळनडुचे मुख्यमंत्री (जन्म: १७ जानेवारी १९१७)
१९८८ : प्रसिद्ध लेखक जैनेंद्रकुमार यांचे निधन.
१९९३ : स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक पेरीयार ई. व्ही. रामस्वामी यांचे निधन. (जन्म: १७ सप्टेंबर १८७९)
१९९९ : नायकी इंक चे सहसंस्थापक बिल बोरमन यांचे निधन. (जन्म: १९ फेब्रुवारी १९११)
२००० : कूपर कार कंपनीचे सहसंस्थापक जॉन कूपर यांचे निधन. (जन्म: १७ जुलै १९२३)
२००५ : भानुमती रामकृष्ण - तामिळ व तेलगू चित्रपटांतील अभिनेत्री, दिग्दर्शक, निर्माती, गीतकार, संगीतकार, गायिका व लेखिका (जन्म: ७ सप्टेंबर १९२५).

# रताळ्याच्या या आहेत प्रसिद्ध जाती; होईल उत्पादनात वाढ



रताळे हे नैसर्गिकरित्या गोड मूळ पीक आहे. वर्षभर त्याची लागवड केली जाते. पण विशेषतः हिवाळ्यात त्याचे प्रमाण जास्त असते. बाजारात रताळ्याला नेहमीच मागणी असते. बटाट्यासारखे दिसणारे रताळे विविध राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर घेतले जातात. आज संपूर्ण जगाला भारतात पिकवल्या जाणार्या रताळ्याची चव आवडते.

भारतातील रताळ्याच्या पाच प्रसिद्ध जातींबद्दल जाणून घेऊया ज्यांच्या लागवडीमुळे चांगले उत्पादन मिळते आणि शेतकरी त्याची लागवड करून चांगला नफा देखील मिळवू शकतात. रताळ्याच्या पाच प्रसिद्ध जाती आहेत ज्यांच्या लागवडीमुळे चांगले उत्पादन मिळते आणि शेतकरी त्यांची लागवड करून चांगला नफा देखील मिळवू शकतात.

या जातींची लागवड करा : शेतकरी रताळ्याच्या काही सुधारित वाणांची लागवड करू शकतात. या सुधारित वाणांमध्ये श्रीभद्रा वाण, गौरी वाण, श्री कनका वाण, सिप्सवा २ वाण आणि -१४ वाणांचा समावेश आहे. या जातींची लागवड करून चांगला नफा मिळवता येतो.

श्रीभद्रा : ही रताळ्याची उच्च उत्पन्न देणारी जात आहे. ही जात ९० ते १०५ दिवसांत तयार होते. त्यात रुंद पाने असतात. हे कंद आकाराने लहान आणि गुलाबी असतात. या कंदामध्ये ३३ टक्के कोरडे पदार्थ, २० टक्के स्टार्च आणि २.९ टक्के साखर असते.

गौरी : रताळ्याच्या या जातीचा शोध १९९८ साली लागला. गौरी वाण तयार होण्यासाठी ११० ते १२० दिवस लागतात. रताळ्याच्या या जातीच्या कंदांचा रंग जांभळा आणि लाल असतो. गौरी जातीच्या रताळ्याचे सरासरी उत्पादन हेक्टरी सुमारे २० टन आहे. श्री कनका : रताळ्याची श्री कनका जात २००४ मध्ये विकसित करण्यात आली. या जातीच्या कंदाची साल दुधाळ रंगाची असते. तो कापल्यावर पिवळ्या रंगाचा लगदा दिसतो. ही जात १०० ते ११० दिवसांत पक्व होते. या जातीचे उत्पादन हेक्टरी २० ते २५ टन आहे.

सीपवा- २ : रताळ्याच्या या जातीचे उत्पादन आम्लयुक्त जमिनीत होते. त्यामध्ये कॅरोटीन मुबलक प्रमाणात असते. रताळ्याची ही जात ११० दिवसांत पिकते. त्याचे उत्पादन हेक्टरी २० ते २४ टन आहे. एसटी -१४ : रताळ्याच्या या जातीचा शोध २०११ मध्ये लागला. रताळ्याच्या या जातीच्या कंदांचा रंग किंचित पिवळा असतो. लगद्याचा रंग हिरवा आणि पिवळा असतो. या जातीमध्ये व्हिटा कॅरोटीन (२० मिग्रॅ प्रति ३० ग्रॅम) जास्त प्रमाणात असते. ही जात तयार होण्यासाठी ११० दिवस लागतात. जर आपण त्याच्या उत्पादनाबद्दल बोललो तर ते सुमारे ७० टन प्रति हेक्टर आहे.

# रस्त्यांच्या मध्येच विद्युत रोहित्र; उघड्या रोहित्रांमुळे दुर्घटनेची भिती

## महावितरण व नगरपालिकेच्या निषेधार्थ लक्ष्यवेधी बोंबाबोंब आंदोलन

बीड। प्रतिनिधी

बीड शहरात शासनाच्या नगरोत्थान सुवर्ण जयंती टप्पा क्रमांक १ मधुन ७० कोटी रूपयांची आणि टप्पा क्रमांक २ मध्ये ६९ कोटी रुपयांची अशी एकूण जवळपास १४० कोटी रुपयांची ६० फुट रूंदीचे सिमेंट रस्ते व नाल्यांची कामे करण्यात आली.मात्र रस्त्यांच्या मध्यभागी महावितरणचे विद्युत पोल व विद्युत रोहित्रांमुळे ईतरत्र हलविण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली नाही. नगरपालिका आणि महावितरण एकमेकांकडे बोट दाखवत जबाबदारी टाळत आहेत. रस्त्यांच्या मध्यभागी असणाऱ्या महावितरणचे पोल व विद्युत रोहित्रांमुळे रस्त्याने जाणाऱ्या वाहनांना वाहतुकीस अडथळा व अपघाताचा धोका निर्माण झाला असुन विद्युत पोल व रोहित्र ईतरत्र सुरक्षित ठिकाणी हलविण्यात यावेत या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२३ सोमवार रोजी नगरनाका ते कृषी कॉलनी दरम्यान तुळजाई चौक याठिकाणी नगरपालिका व महावितरणच्या निषेधार्थ बोंबाबोंब आंदोलन करण्यात आले. निवेदन जिल्हाधिकारी बीड , मुख्याधिकारी नगरपालिका बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, ऊर्जा मंत्री यांना देण्यात आले यावेळी शेख युनुस,सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार, हरिओम क्षीरसागर,शिवशक्ती भिमशक्ती विचारमंचचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे आणि नागरीक उत्तमराव मिसाळ,मुकुंद भुतपल्ले, वालचंद चाटे,मोहन खरमाटे, गणेश वाघ, महावीर बोरा, विनायक घोळवे,रामराजे राक्षसभुवनकर, महेश मेहेत्रे, डॉ.मोरे, ज्ञानेश्वर राऊत, ओंकार जोशी, नामदेव वाघ, प्रविण कुलकर्णी,सारंग जोशी,विजय काटे, इंजिनिअर घोळवे, श्रीरंग शिंदे, रविंद्र पौळ आदी सहभागी होते.








### महावितरणने उपाययोजना करावी

बीड शहरात रस्त्यांच्या कडेला जमिनी लगत उघडे विद्युत रोहित्र आणि उघडे विद्युत खांब आहेत.ते अपघातास कारण ठरू शकतात. शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह रोड,तुळजाई चौक , राजीव गांधी चौक, बार्शी नाका ,केएसके महाविद्यालय,बालेपीर,माने कॉम्प्लेक्स रोड, सुभाष रोड, जालना रोड, जुने एसपी कार्यालय,कंकालेश्वर मंदिर,साठे चौक आदी ठिकाणी उघडे आणि जमिनीलगत रोहित्रांची वीज उपकरणे , फ्युज बॉक्स , पुर्णपणे उघडे व मोडकळीस आलेले आहेत.रोहित्र जमिनीलगत असल्याने याचा मोठा धोका निर्माण झाला असुन ते जमिनीपासून किमान १० फुट उंच असणे आवश्यक आहे. नगरपालिकेने सिमेंट रस्ते केल्याने शहरातील मुख्य रस्त्यासह चौकाचौकात २२ ठिकाणी उघडे जमिनी लगत रोहित्र असल्याने याचा नागरीकांसह जनावरांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे.महावितरणचे याकडे दुर्लक्ष असुन भविष्यात दुर्घटना घडण्यापुर्वीच तातडीने आवश्यक उपाययोजना करण्यात यावी.

बीड शहरात गेल्या २ वर्षांपासून नगरोत्थान सुवर्ण जयंती टप्पा क्रमांक १ मधुन ७० कोटी आणि टप्पा क्रमांक २ मधुन ६९ कोटी रुपयांची एकुण जवळपास १४० कोटी रूपयांची ६० फुट रूंदीचे सिमेंट रस्त्यांची व नालींची कामे करण्यात आली. रस्ते व नाली बांधकामास निधी मिळाला मात्र रस्त्यावरील पोल व वीज रोहित्र ईतरत्र हलविण्यासाठी निधीची तरतूद नसल्याने स्थलांतरित करण्यात आले नाहीत.परंतु रस्त्याच्या मध्ये वाहतुकीस अडथळा व अपघाताला निमंत्रण ठरणा-या रोहित्र आणि विद्युत खांब काढण्याची तसदी संबंधित विभागाने घेतली नाही. बीड शहरातील नगरनाका ते कृषी कॉलनी दरम्यान असणाऱ्या रस्त्यावरच तुळजाई चौकाच्या पुढे जागोजागी महावितरण चे विद्युत पोल असून ते एका सरळ रेषेत नाहीत.

त्यातच एसबीआय बँकेच्या जवळ असणाऱ्या विद्युत रोहित्रांनी रस्त्याच्या मधोमध स्थान मांडलेले असून रस्त्याने जाणाऱ्या वाहनांना अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे. नगर नाका ते कृषी कॉलनी हा अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. या रस्त्यावर नाट्यगृह ,अनेक दवाखाने, वाचनालय ,शाळा यांच्यासह अनेक खाजगी शिकवण्या आहेत. एसबीआय बँकेची शाखा याच मार्गावर असल्यामुळे विद्यार्थ्यांचे तसेच नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ या रस्त्यावर असते. मध्यंतरी या रस्त्याचे काम करून हा रस्ता सिमेंटचा बनविण्यात आला. परंतु रस्त्याच्या मधोमध धोकादायक स्थितीमध्ये असणारे विद्युत रोहित व खांब असल्याने ते देखील कललेल्या स्थितीत आहेत. त्याच्या चोहींकडुन लटकणाऱ्या विद्युत तारांमुळे नागरिकांची मोठे गैरसोय होत असून त्या ठिकाणी अपघात होण्याची भीती निर्माण झाली आहे .रस्त्याच्या मध्येच विजेचे रोहित्र असल्यामुळे अनेक वेळा वाहनधारकांना समोरून येणारे वाहन ब-याच वेळा लक्षात येत नाही .त्यामुळे अपघात देखील झालेले आहेत .त्यामुळे हे विजेचे खांब आणि रोहित रस्त्याच्या एका बाजूला घेऊन लटकणाऱ्या तारा सुव्यवस्थेत करून नागरिकांना होणाऱ्या गैरसोयीतून मुक्त करण्यात यावे.अशी या भागातील नागरिकांची मागणी आहे. बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, राजीव गांधी चौक, बार्शी नाका ,केएसके महाविद्यालय,आदी ठिकाणी सुद्धा रस्त्याच्या मधोमध विद्युत रोहित्र,विद्युत खांब,फोनची डीपी आदी वाहतुकीस अडथळा व अपघाताला निमंत्रण देणारी असुन नगरपालिका व सार्वजनिक बांधकाम विभाग याबाबत आवश्यक उपाययोजना करत नाही त्यामुळे रोहित्र सुरक्षित ठिकाणी हलविण्यात यावेत.

# परळी नगर पालिका प्रशासनाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर!

## निकृष्ट दर्जाच्या कामांची चौकशी करून त्वरित कारवाई करा-राजेभाऊ फड

परळी। प्रतिनिधी

परळीच्या नगर पालिका प्रशासनाचा कारभार आता चव्हाट्यावर आला आहे. शहरातील अस्वच्छता, सर्वत्र पसरत चाललेली दुर्गंधी, भुयारी गटार योजनेचे निकृष्ट काम आणि शहर अंतर्गत झालेली रस्त्याची दुरवस्था यामुळे शहरवासीयांना प्रचंड त्रास भोगावा लागत आहे. प्रशासनावर कोणाचाही अंकुश नसल्याचा हा सर्व परिणाम असून, सर्व बोगस कामांची तत्काळ चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी नगर पालिका प्रशासनाला वारंवार शहरातील समस्यांचे निवेदन दिले आहेत. ज्यात अनेक नागरी समस्यांची सोडवणूक करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनाद्वारे म्हटले आहे की, शहरातील स्वच्छतेसाठी महिण्याकाठी लाखो रुपयांचा चुराडा करण्यात येतो मात्र तरीही शहरात सर्वत्र दुर्गंधी पसरलेली दिसून येत आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. भुयारी गटार योजनेचे काम करीत असलेली एजेन्सी निकृष्ट दर्जाची कामे करीत आहे. शहर भागात अनेक गटार चोकप झाले असून काही ठिकाणी गटारांत पाईप न बसवता फक्त चेंबर बनवण्यात आले आहेत.

### बोगसगिरीचा पाढा जनतेसमोर वाचणार

परळी नगर पालिकेत अनेक कामे बोगस चालतात. शहरातील स्वच्छतेचे तीनतेरा वाजले आहेत, कर्मचारी गैरहजर असतात, घरकुल योजनेत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार होत आहेत. पाणीपुरवठ्याचे नियोजन नाही, शहराचे वैभव असलेले अनेक बांधकामे अपूर्ण आहेत, रस्त्यांची दुरवस्था आणि अशा अनेक गोष्टी आहेत. या सर्वांचा पाढा जनतेसमोर आपण सविस्तर पद्धतीने ठेवणार असून यावर वृत्तमालिका चालवली जाईल असेही राजेभाऊ फड यांनी म्हटले आहे.

शहरात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत बांधण्यात आलेल्या सार्वजनिक शौचालयांची अत्यंत दुरवस्था झालेली असून, देखभाल करण्याची जबाबदारी असलेली एजेन्सी त्यांची स्वच्छता करीत नाही. रस्ते, नाल्या आणि सांडपाणी व्यवस्थेचे तीनतेरा झालेले दिसून येतात. एवढा भोंगळ कारभार चाललेला असतांनाही मुख्याधिकारी त्याकडे दुर्लक्ष का करतात? असा नागरिकांना प्रश्न पडला आहे. मुख्याधिकारी यांचे दुर्लक्ष असल्याने अनेक कर्मचारी गैरहजर असतात, यामुळे नागरिकांची अनेक कामे खोळंबली आहेत. प्रशासनाने जनतेच्या संतापाचा अंत न पाहता बोगस कामे करणाऱ्या एजन्सीची चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी राजेभाऊ फड यांनी केली आहे. वेळेत मागणी पूर्ण न झाल्यास तीव्र लोकआंदोलन उभे करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

# शेतकऱ्यांच्या उत्पादनाला हमीभाव देऊन खरेदी केंद्र सुरू करा

## विजेचे खाजगीकरण थांबवा-प्रा. सुशीलाताई मोराळे

बीड। प्रतिनिधी

दिनांक २३ डिसेंबर हा राष्ट्रीय शेतकरी दिवस संपूर्ण देशात साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य म्हणून आज संपूर्ण देशभर संयुक्त किसान मोर्चा नवी दिल्ली व किसान संघर्ष समितीच्या वतीने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांना शेतकऱ्यांच्या मागण्याचे निवेदन प्रा. सुशीलाताई मोराळे राष्ट्रीय उपाध्यक्ष किसान संघर्ष समिती मार्फत देण्यात आले.

दिवसेंदिवस शेती क्षेत्र कार्पोरेटच्या घशात घातले जात आहे. पंजाब हरियाणा चा शेतकरी या विरोधात लढत आहे. जगजीत सिंग डल्लेवाल हे प्राणांतिक उपोषणाला बसले आहेत. त्यांचा प्राण धोक्यात आला आहे मात्र सरकार एक शब्द बोलत नाही. देशात एनडीए ३ सरकार लोकशाहीची हत्या करत आहे. पंजाबच्या शंभू व खनौरी सीमावर हजारो शेतकरी बसले आहेत. अश्रुधुर, रबराच्या गोळ्या, पाण्याचे फवारे त्यांच्यावर सोडले जात आहेत. अत्यंत क्रुरतापूर्वक हे आंदोलन चिरडण्याचे काम सुरू आहे. गेली २१ दिवस ग्रेटर नोएडाच्या जेलमध्ये शेतकऱ्यांना कोंडले आहे. नवी राष्ट्रीय कृषी बाजार नीती, तीन कृषी कायदे मागच्या दाराने पुन्हा पारित करण्याचा डाव आहे. राष्ट्रीय कृषी बाजार नीती परत घ्या, डिजिटल कृषी मिशन व राष्ट्रीय सहयोग निती वापस घ्या. संघर्ष करणाऱ्या शेतकरी संघटनांशी चर्चा करा. एम एस पी ऋण माफी धोरण अंमलबजावणी करा. विजेचे खाजगीकरण थांबवा. शेतकऱ्यांचे दमण तंत्र थांबवा. जगजीत सिंग डल्लेवाल चे प्राण वाचवा. आशा मागण्या किसान किसान संघर्ष समितीच्या वतीने जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांच्यामार्फत राष्ट्रपती द्रोपदी मुरमु यांना निवेदन देवुन केल्या आहेत. या निवेदनावर माऊली शिरसाट बबनराव आंधळे राजेंद्र दराडे सचिन गवळी उद्धव सानप तुकाराम बारगजे इत्यादींच्या सह्या आहेत.




### बीड नगरपालिकेच्या आधार केंद्रात नागरिकांची गर्दी

बीड प्रतिनीधी

इतर आधार केंद्रे बंद असल्यामुळे नगरपालिकेच्या आधार केंद्रावर नागरिकांची मोठी गर्दी उसळली आहे. दोन-दोन दिवस रांगेत उभे राहूनही नंबर न मिळाल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. नंबर आल्यासही दिवसभर उपाशीपोटी थांबावे लागत असल्यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.नगरपालिकेच्या पार्किंगमध्ये आधार केंद्र असल्यामुळे तेथील अस्वच्छतेमुळे आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. यामुळे नागरिक आरोग्याच्या समस्यांना सामोरे जात आहेत.


आधार केंद्रावर पिण्याच्या पाण्याची, बसण्यासाठी जागा किंवा महिलांसाठी वॉशरूमही उपलब्ध नाही.आजूबाजूची सर्व आधार केंद्रे बंद असल्याने येथे नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे, परिणामी दोन-तीन दिवसांचा कालावधी घेतल्यानंतरच काम पूर्ण होत आहे.या परिस्थितीवर तात्काळ तोडगा काढण्याची मागणी सर्वसामान्य नागरिक करत आहेत. पाण्याची सोय, स्वच्छता, वॉशरूमची उपलब्धता आणि गर्दी नियंत्रणासाठी इतर आधार केंद्र तत्काळ सुरू करावीत, अशी विनंती नागरिकांकडून प्रशासनाला करण्यात आली आहे. प्रशासनाने या समस्येकडे लक्ष दिल्यास नागरिकांची गैरसोय कमी होऊ शकेल.

### जिल्हा रुग्णालय समोर 'नो पार्किंग'मध्ये गाड्या उभ्या करणाऱ्या वाहनधारकांवर कारवाई

बीड प्रतिनीधी

जिल्हा रुग्णालयाच्या मुख्य गेटसमोर 'नो पार्किंग' मध्ये गाड्या उभ्या करणाऱ्या वाहनधारकांवर आज वाहतूक शाखेच्या वतीने कडक कारवाई करण्यात आली. जिल्हा रुग्णालयासमोरील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था उपलब्ध करून दिली असली, तरी काही वाहनधारकांकडून याकडे दुर्लक्ष करून रुग्णालयासमोरच गाड्या उभ्या केल्या जात आहेत.

वाहतूक शाखेने या बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करत 'नो पार्किंग'मध्ये उभ्या असलेल्या २५ ते ३० वाहनांचे चलन फाडले. मुख्य गेटसमोर वाहनांची बेशिस्त पार्किंगमुळे रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता.वाहतूक शाखेने ही कारवाई करत वाहनधारकांना पार्किंगच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले असून, भविष्यात अशा प्रकारे नियमभंग करणाऱ्यांवर आणखी कठोर पावले उचलण्याचा इशाराही देण्यात आला आहे.



# मोफत किडनी स्टोन व संबंधित आजार शिबिर

## शस्त्रक्रियेचा खर्च आणि औषधाचा खर्च कमी होतो-डॉ. महेंद्र गौशाल

बीड। प्रतिनिधी

जिल्ह्यात किडनी स्टोनचे हजारो रुग्ण असून, रुग्णांना लाखो रुपये किडनी स्टोन ऑपरेशनसाठी खर्च करावे लागत आहेत. अनेक रुग्ण उपचारापासून वंचित राहतात. दैनंदिन जीवनातील धावपळीमुळे सामान्य माणसांना आरोग्याकडे लक्ष देण्यासाठी वेळ नसतो. ही बाब लक्षात घेऊन डॉ. सचिन वारे यांनी मोफत रोग निदान व होमिओपॅथिक औषध उपचार शिबिराचे आयुष क्लिनिक, उमाकिरण, बीड येथे दिनांक २१ डिसेंबर २०२४, शनिवार रोजी आयोजन केले होते.

डॉ. सचिन वारे यांनी आयोजित केलेल्या मोफत किडनी स्टोन व किडनी संबंधित आजारांवर निदान व उपचार शिबिराचे उद्घाटन डॉ. महेंद्र गौशाल यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी श्री. निलेश वाघ, श्री. सुनिल मिश्रा, श्री. संतोष जमदाडे यांचीही उपस्थिती होती. डॉ. महेंद्र गौशाल यांनी धन्वंतरी व डॉ. सॅम्युअल हॅनिमॅन यांच्या प्रतिमेचे पूजन करून शिबिराची सुरुवात केली. श्री. निलेश वाघ यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली, तसेच प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.ते म्हणाले, आजचा जो कॅम्प आहे तो होमिओपॅथीच्या माध्यमातून आहे, हे या कॅम्पचे वैशिष्ट्य आहे. अनेक व्याधी माणसाला भेडसावत असतात, त्यापैकी किडनी स्टोन या आजारावर डॉ. सचिन वारे कार्यरत आहेत ही उल्लेखनीय बाब आहे. यामुळे रुग्णांना अनेक फायदे मिळत असून शस्त्रक्रियेचा खर्च आणि औषधाचा खर्च कमी होतो. तसेच किडनी स्टोनमुळे येणारे अनुषंगिक आजार कसे टाळता येतात हे डॉ. सचिन वारे यांच्या सखोल अभ्यासातून समजते. होमिओपॅथीच्या माध्यमातून जनजागरण करून सामाजिक भान त्यांनी जपले आहे, हे कौतुकास्पद आहे.त्यामुळेच बीड जिल्ह्यातील तसेच संपूर्ण राज्यातील रुग्ण उपचारासाठी येतात आणि त्यांच्या सेवे साठी डॉ. सचिन वारे आणि त्यांची टीम सतत सज्ज असते. त्यांना या शिबिरासाठी शुभेच्छा असे डॉ. प्राचार्य गौशाल यांनी सांगितले. त्यानंतर लगेचच रुग्ण तपासणी सुरु झाली. दुपारी ३ वाजेपर्यंत शिबिरामध्ये एकूण ४० रुग्णांनी लाभ घेतला. नागरिकांनी या शिबिराला चांगला प्रतिसाद दिला असून रुग्णांनी त्यांच्या आरोग्याच्या तंदुरुस्तीसाठी मोफत तपासणी व उपचारांचा लाभ घेतला.दरम्यान, रुग्णांना सात दिवसांचे औषध मोफत देण्यात आले. सोनोग्राफी अल्प दरात करण्यात आली आणि रक्त चाचण्या केवळ ३० टक्के दरात करण्यात आल्या. डॉ. सचिन वारे यांच्या १९ वर्षांच्या अनुभवामुळे आणि त्यांच्या उत्कृष्ट सेवांमुळे रुग्णांना प्रभावी उपचार मिळाले. आयुष क्लिनिकमध्ये झालेल्या या शिबिराने रुग्णांच्या आरोग्याच्या तंदुरुस्तीसाठी उत्कृष्ट सेवा दिली असून सर्वांनी याचा लाभ घेतला. शिबिराच्या आयोजनात श्री. सिरसाट, कु. अस्मिता कांबळे आणि श्री. राहुल राऊत यांचे सहकार्य लाभले.




### स्वामी समर्थ केंद्रात बाल संस्कार बक्षीस वितरण समारंभ



पाटोदा

काल रविवार दिनांक २२ रोजी अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ केंद्र दिंडोरी प्रणित सेवा मार्ग नाशिक यांच्या वतीने घेण्यात आलेल्या बालसंस्कार शिबिरात सोमवारी बक्षीस वितरण समारंभ पार पडला विद्यार्थ्यांना मूल्य संस्काराचे धडे देण्यात आले आजच्या नवीन पिढीचा सर्वांगीण विकास होण्यासाठी मूल्य संस्काराचे धडे दर रविवारी देण्यात येतात मुलांचा शारीरिक व मानसिक विकास होण्यासाठी बालसंस्कार हे गरजेचे आहे शहरातील मुलांनी जास्तीत जास्त मुला मुली सुद्धा यात सहभागी व्हा असे स्वामी समर्थ केंद्र च्या वतीने आव्हान करण्यात आले आहे येते कार्यक्रम पार पडल्यानंतर प्रमाणपत्र वितरित करण्यात आले . कोकाटे मॅडम. फुदे.मॅडम. याच्या हास्ते.. योग प्रशिक्षक लाड सर. सतीश गर्जे.सतिश. चोले.विजय अंदूरे.यांच्या हस्ते करण्यात आले

cmyk

राज्य लोकतंत्र

मंगळवार, दि.२४ डिसेंबर २०२४ | ६

# महाराष्ट्र केसरी सिकंदर शेखने पंजाब केसरी भोला ठाकूरला बीडच्या मातीत लोळवले

दिंद्रुड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील देवदहिफळ येथे भव्य कुस्तीच्या दंगलीचे आयोजन करण्यात आले होते. देशातील नामांकित पहिलवानांनी या दंगलीस उपस्थिती लावत कुस्तीचे मैदान गाजवले. महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख व पंजाब केसरी भोला ठाकूर यांची लढत या दंगलीत रंजक होती. अवघ्या साडेतीन मिनिटात सिकंदर ने भोलाची पाठ जमिनीवर लोळवत त्याला आसमान दाखवले. पाच लाख रुपयांचे रोख पारितोषिक पटकावून सिकंदरने पटेल युवा केसरी चा बहुमान मिळवला. आयोजकांनी पारितोषिक दिले.

धारूर तालुक्यातील बालाघाटच्या पायथ्याशी शेकडो कुस्तीच्या तालमीत हजारोंच्या संख्येने पैलवान घडत आहेत. देवदहिफळ येथे प्रथमच देश पातळीवरील पहिलवान यांच्या कुस्त्यांच्या दंगलीचे आयोजन येथीलल पटेल युवा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले होते. महाराष्ट्र केसरी शिवाजी केकान व सईद चाऊस, महाराष्ट्र चॅम्पियन गणपत मुंडे, अंगद शेप, महेबूब शेख, हमीद शेख, जब्बार शेख,माऊली गोरे, गंगाभाऊ चौरे यांची प्रमुख उपस्थिती या दंगलीत होती. देशभरातील नामवंत पैलवानात गणले जाणारे समीर शेख (पुणे) ची कुस्ती धनाजी कोळी (पुणे) यांच्या सोबत बरोबरीत सुटली. दोघात दीड लाख रुपयांचे बक्षीस आयोजकांनी विभागून दिले. अटीतटीच्या लढतीत सुमित बारस्कर (पुणे) याने संदीप लटके (पाटोदा), पृथ्वीराज वनवे (जामखेड) याने राजू कदम (नांदेड), उमर शेख (नेकनूर) याने मोनू सिंग (नांदेड) यास पराभूत केले. सर्व विजयी उमेदवारांना प्रत्येकी एक लाख रुपयांचे बक्षीस आयोजकांनी दिले. अबू चाऊस,कुर्डूवाडी व कृष्णा पवार,पाटोदा यांच्यासह बाळु बहिरवाल पाटोदा ची शुभम कोळेकर कोल्हापूर यांची एक लाख रुपयांची कुस्ती बरोबरीत सुटली. अनिकेत गोरे व लक्ष्मण करे, ऋतुजा शिंदे होळ, वैष्णवी सोळंके जालना यांची कुस्ती शौकिनांच्या डोळ्याचे पारणे फेडणारी दंगल केली. पटेल युवा प्रतिष्ठानचे मतीन शेख यांच्या मार्गदर्शनात वसीम शेख,रफिक शेख, अहमद पटेल, विष्णू बडे, नय्युम शेख, युनूस शेख, कालू शेख, सुग्रीव मुंडे, सुधाकर घुगे, सद्दाम शेख, सुरज शेख, मारुती बडे, अखिल सय्यद, इकबाल शेख यांनी या दंगलीचे आयोजन केले होते. पहाडी आवाजात महादेव मुजमुले व युवराज सोनलकर यांनी बहारदार कुस्त्यांचे समालोचन केले.





# महावितरण अधिकाऱ्यांचा मस्तवालपणा

## जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला दाखवली केराची टोपली

## संभाव्य धोका टाळण्यासाठी घरावरुन गेलेली विद्युत तार हटविण्याची ग्रामस्थांनी केली होती मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील दासखेड येथील काही घरावरून महावितरणच्या विद्युत तारा गेल्या असुन या अनुषंगाने गावकऱ्यांनी कार्यालयास अनेकदा निवेदने देवून तार हटविण्याबाबत ग्रामस्थांनी लेखी मागणी केलेली होती. मात्र गेल्या ७ ते ८ महिन्यापासून पाटोद्यातील विद्युत कार्यालयातील अधिकारी केवळ कागदी घोडे नाचविण्यात मग्न झाल्याचे दिसून येत आहेत. प्रत्यक्ष या बाबत संबंधित कार्यालयाने कोणतीही कार्यवाही करत नसल्याचे दिसून येते. या बाबत गावकऱ्यांनी वेळोवेळी अधिकाऱ्याकडे पाठपुरावा केला होता परंतु कार्यालयातील अधिकाऱ्यांकडून उडवा उडवीची उत्तरे दिली जातात. या संदर्भातील जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांनी दि.१८/४/२०४ संबंधित विभागाला आदेशीत करून योग्य ती कारवाई करावी असे म्हटले होते. मात्र संबंधीत विभागाचे अधिकारी इतके निर्ढावलेले आहेत की, दस्तुरखुध्द माननीय जिल्हाधिकारी साहेब यांच्या आदेशाला त्यांनी केराची टोपली दाखवलेली आहे. मा.जिल्हाधिकाऱ्यांच्या पत्रा बाबत ही संबंधीत खाते उदासीन असल्याचे दिसून येत आहे. प्रशासनाच्या दप्तर दिरंगाईमुळे ग्रामस्थांत असंतोष वाढत असून आता न्याय मागणीसाठी आंदोलनात्मक पवित्रा घेण्याचा निर्धार नागरिकांकडून घेण्यात येत आहे.



बीड : पत्रकार रवी उबाळे यांची मराठी पत्रकार परिषदेच्या संभाजीनगर विभागीय सचिव पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा विभागीय समन्वयक सुभाष चौरे ,गेवराईचे पत्रकार सुभाष सुतार, संपादक अभिमन्यू घरत, मराठी पत्रकार परिषदेचे राज्य कार्यकारिणी सदस्य विलास डोळसे, जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हांगे आदींनी त्यांच्या सत्कार करून अभिनंदन केले.

# आता ग्रामसेवकांनाही द्यावी लागणार जीपीएस आणि बायोमेट्रिक पद्धतीने हजेरी

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने ग्रामसेवकांच्या हजेरी बाबत जिल्हा परिषदे कडून माहिती मागविण्यात आली असून शहराच्या लगत असलेल्या आणि जिथे नेटवर्क कनेक्टिव्हिटी आहे अशा ठिकाणी आता ग्रामपंचायत मध्ये ग्रामसेवकांची दररोज जीपीएस आणि बायोमेट्रिक पद्धतीने हजेरी लागणार आहे . या संदर्भात शासनाच्या उपसचिव सीमा जाधव यांनी नुकतेच आदेश काढले असून यासंदर्भात विभागीय आयुक्त आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी असे आदेशात म्हटले आहे.

## दांडी बहाद्दरांची होणार अडचण

**जिल्हा परिषदेने ग्रामसेवकांच्या जीपीएस आणि बायोमेट्रिक पद्धतीचा अवलंब लागू केला आणि दररोज हजेरी देणे बंधनकारक केले तर अनेक दांडी बहाद्दरांची अडचण होणार आहे. कारण काही ग्रामसेवक आठ आठ दिवस त्यांच्याकडे असलेल्या गावात जात नाहीत .कुठल्या गावाला आहेत हे विचारले तर ते सांगतात मी तिसऱ्याच गावाला आहे. किंवा पंचायत समितीमध्ये आहे. मात्र प्रत्यक्ष गावाला न गेल्याने अनेकांची कामे वेळेवर होत नाहीत. आता ही प्रणाली नागरिकांच्या दृष्टीने फायद्याची असली तरी अनेक दांडी बहाद्दरांची मात्र यामुळे अडचण होणार आहे.**

महाराष्ट्र विधान मंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिलेल्या आश्वासनानुसार ग्रामसेवकांचे हजेरी बाबत काही जिल्हा परिषदेकडून माहिती आलेली आहे. या माहितीनुसार जिल्हा परिषदेमध्ये मुख्यालयाच्या ठिकाणी बायोमेट्रिक हजेरी प्रणाली आणि फेस रिडींग प्रणाली यासारख्या अद्यावत यंत्रणेच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांची हजेरी नोंदवली जाते. ग्रामसेवकांच्या बाबतीत ज्या ग्रामपंचायत या शहरालगत आहेत अशा ग्रामपंचायतीमध्ये बायोमेट्रिक हजेरी राबवण्यात येते. मात्र अतिदुर्ग डोंगराळ भागात नेटवर्क कनेक्टीव्हीटी नसल्याने बायोमेटिक प्रणालीद्वारे हजेरी प्रक्रिया राबवण्यास समस्या येऊ शकतात. तथापि सद्यस्थितीत बहुतांश भागांमध्ये नेटवर्क कनेक्टिव्हिटी उपलब्ध आहे. त्यामुळे ज्या ग्रामपंचायती या शहरालगत आहेत. किंवा ज्या ठिकाणी नेटवर्क कनेक्टीव्हीटी आहे अशा ठिकाणच्या ग्रामपंचायत मध्ये बायोमेट्रिक आणि जीपीएस हजेरी प्रक्रिया राबविणे शक्य आहे. ग्रामसेवक आणि ग्रामविकास अधिकारी यांची बायोमेट्रिक आणि जीपीएस हजेरी प्रणाली राबविण्यासाठी विभागीय आयुक्तांनी आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आवश्यक ती कारवाई करावी असे उपसचिव सीमा जाधव यांनी आदेशात म्हटले आहे.

# राज्यस्तरीय ओवी ज्ञानेशाची स्पर्धेत समृद्धी पटवा तृतीय

अंमळनेर । प्रतिनिधी

राज्यस्तरीय ओवी ज्ञानेशाची स्पर्धेत पिंपळवंडी येथील कु.समृद्धी विलास पटवा हिने तृतीय क्रमांक पटकावला. या यशाबद्दल समृद्धी पटवा हीचे विविध क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.बीड जिल्ह्यातील खिळद गावातील ओवी ज्ञानेशाची मंडळ यांच्यावतीने ओवी ज्ञानेशाची या स्पर्धेचे गेल्या ३ ऑक्टोबर ते २९ नोव्हेंबर या कालावधीत आयोजित करण्यात करण्यात आले होते. ज्ञानेश्वरी ग्रंथ घराघरात वाचला जावा व



**बीड जिल्ह्यातील ओवी ज्ञानेशाची मंडळाचे आयोजन**

त्यातील अध्यात्मिक आणि वैज्ञानिक सिद्धांत तरुण पिढीला समजावा त्यासोबतच एक चारित्र्यसंपन्न पिढी निर्माण व्हावी या उद्देशाने ओवी ज्ञानेशाची मंडळाच्या वतीने दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यावर्षी या स्पर्धेत राज्यभरातील ६७ जणानी सहभाग घेतला होता.

बीड जिल्ह्यातील खिळद येडेश्वरी मंदिरात झालेल्या या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्यात व्यासपीठावर ह.भ.प. गुरुवर्य श्री सुदर्शन महाराज सांगवीकर, प्रा. हरिश्चंद्र बोडखे, आयोजक पांडुरंग गर्जे, अँड. बाळासाहेब बोडखे, खिळदचे सरपंच डॉ. श्रीराम गर्जे, महंत काशिनाथ महाराज शास्त्री, मुख्याध्यापक चंद्रकांत लोखंडे गुरुजी ◀◀ पान ३ वर

# निराधार योजना अंतर्गत २१ हजार पात्र लाभार्थ्यांचे जमा होणार अनुदान

जालना । प्रतिनिधी

जालना शहर तालुक्यात संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ सेवानिवृत्त वेतन योजना या लाभार्थ्यांना डी.बी.टी. मार्फत त्यांचे खात्यावर पैसे जमा करण्यात येणार आहे. त्यासाठी लाभार्थ्यांना आपल्या बँक खात्याशी आधार क्रमांक आणि मोबाईल नंबर लिंक करावा. यासाठी बँक खात्याशी आधार लिंक करण्या संदर्भात सूचना दिल्या असून संजय गांधी शहर तहसिल कार्यालय येथे समक्ष लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे जमा करुन घ्यावी निराधार व्यक्तींना शासनाकडून विविध योजनांच्या माध्यमातून महिन्याअखेर ठराविक मानधन दिले जाते. यासाठी तहसिलदार यांच्यामार्फत यादी पाठवून त्यानुसार निधीचे वाटप केले जात होते. ती निधी बँकेकडून संबंधित लाभार्थींच्या खात्यात वर्ग केला जात होता. या प्रक्रियेस विलंब होत आहे. त्यामुळे या पुढे डी.बी.टी. मार्फत अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. त्यासाठी या दोन्ही योजनाचा लाभ घेत असलेल्या पात्र निराधारांकडून बँक खात्याला आधार कार्ड, मोबाईल क्रमांक संलग्न करुन संकलित करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. यामुळे जालना शहरातील लाभार्थ्यांनी विहीत मुदतीत आवश्यक ती कागदपत्रे सादर करणे गरजेचे आहे. जे लाभार्थी सदर कागदपत्र या कार्यालयास सादर करणार नाही त्यांचा लाभ बंद झाल्यास त्यासाठी लाभार्थी स्वत: सर्वस्वी जबाबदार राहील. याची नोंद घ्यावी. अशी माहिती तहसिलदार जालना छाया पवार यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

# चऱ्हाटा परिसरात बिबट्या दिसल्याने शेतकऱ्यांमध्ये दहशत

खालापुरी । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चऱ्हाटा परिसरातील दक्षिण बाजूस एडवोकेट अजय तांदळे यांच्या शेतातील पाझर तलावाजवळ काल दि.२२ रविवार रोजी सायंकाळी साडेसात ते पावणे आठ च्या सुमारास या सुमारास



बिबट्याचा वावर दिसून आला. असल्याने असल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले याची माहिती मिळताच बीड तालुका वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी च-हाटा गावाकडे रवाना झाल्याची माहिती मिळाली आहे. च-हाटा परिसरातील दक्षिण बाजूस धुमाळवाडी, जाधव वाडी, कदमवाडी ,पिंपळवाडी ही गावी आहेत एडवोकेट अजय तांदळे यांच्या १३० सर्वे नंबर मधील शेता जवळील पाझर तलावा जवळ फिरत असताना बाजूनेच रस्त्याने दिनकर धुमाळ हे जात होते त्यांना तो बिबट्या दिसला त्यांनी तात्काळ एडवोकेट अजय तांदळे यांना ही माहिती दिली त्यांनी तात्काळ वन विभागाचे अधिकारी तात्काळ च-हाटा गावाकडे रवाना झाले आहेत बिबट्या दिसल्याने परिसरातील जाधव वाडी ,धुमाळवाडी, पिंपळवाडी, कदमवाडी,राजुरी वंजारवाडी, उकंडा, शिरापूर धुमाळ ,या भागातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आता हा बिबट्या रात्रीच्या वेळी कोणीकडच्या दिशेला जातो याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागलेले आहे.

# जालन्यात प्लास्टीक वापरणाऱ्याविरुद्ध कारवाई

जालना । प्रतिनिधी

यापुढे शहरात नियमितपणे कार्यवाही करण्यावर भर सहायक आयुक्त शहरात प्लास्टीक ( ) साठाबाबत माहिती मिळाल्यानुसार जालना शहर महानगरपालिकेमार्फत आज दिनांक २३.१२.२०२४ रोजी दुकानदार/आस्थापना गायत्री प्लास्टीक, जालना यांच्याकडे प्लास्टीक आढळुन आल्याबाबत त्यांच्यावर १०,०००/- अक्षरी दहा हजार रुपये दंड व ६५० किलो प्लास्टीक जप्त करण्यात आले. सदरच्या कार्यवाहीमध्ये जालना



मनपाच्या सहायक आयुक्त श्रीमती सुप्रिया चव्हाण, स्वच्छता विभाग प्रमुख पंडीत पवार, स्वच्छता निरीक्षक श्री. अशोक लोंढे, श्री. शोएब खान व इतर कर्मचारी उपस्थित होते.

करिता जालना शहर महानगरपालिकेमार्फत शहरातील सर्व आस्थापना/दुकानदार व नागरिक यांना आवाहन करण्यात येते की, शासनाकडुन एकल प्लास्टीकचा ( ) वापर, वाहतुक, विक्री व साठाबाबत बंदी असुन एकल प्लास्टीकचा वापर, विक्री वाहतुक व साठा करु नये नसता कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशा इशारा जालना शहर महानगरपालिका व महाराष्ट्र प्रदुषण मंडळामार्फत याबाबत नियमितपणे तपासणी/पाहणी करण्यात आहे. प्लास्टीक वापरकर्त्यांवर दंडनीय कार्यवाही करुन गुन्हा नोंद करण्याबाबतची देखील कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच शहरात ज्याठिकाणी प्लास्टीक वाहतुक, विक्री, वापर व साठा होत असेल तर कारवाई करण्यात आले.

# रंजना भावसार जायंट्स वेल्फेअर फाउंडेशनच्या उत्कृष्ट युनिट डायरेक्टर पुरस्काराने सन्मानित

वडवणी । प्रतिनिधी

नाशिक येथील सामाजिक कार्यकर्त्या तथा अखिल भारतीय भावसार क्षत्रिय महासभा महाराष्ट्र राज्य महिला परिषदेच्या राज्य सचिव रंजना भावसार यांना वर्षे २०२४ साठी जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन फेडरेशन २ चा उत्कृष्ट युनिट डायरेक्टर पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.




याबाबत अधिक माहिती अशी की महाराष्ट्रात जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन, फेडरेशन चे सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात मोठे योगदान आहे.जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन च्या वतीने राज्य भर विविध उपक्रम राबविले जातात या मध्ये रक्तदान शिबीर ,मुल दत्तक घेणे,वृक्ष लागवड ,गरजुना ताडपत्री वाटप , कॅन्सर पेशंट साठी उपचार , जयपूर फुट्स,सामुहिक विवाह सोहळा , गरीब विद्यार्थ्यांना सर्व प्रकारची मदत ◀◀ पान ३ वर

# जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या कर्मचारी भरती परीक्षेत सावळा गोंधळ

जालना । प्रतिनिधी

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या पदभरती साठी महाराष्ट्र भर जाहिरात देऊन विद्यार्थी वर्गाकडून परीक्षा शुल्क घेउन जील्हाबाहेरील परीक्षा केंद्र देऊन ऐन वेळी सदर विद्यार्थी यांची परीक्षा कोणतेही कारण

नसताना रद्द करून परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांना अपमानास्पद वागणूक देण्यात आली. या सर्व प्रकारची माहिती मिळताच माजी आ. कैलास गोरंट्याल यांच्या नेतृत्वात जिल्हा काँग्रेस कमिटीच्या पदाधिकारी यांनी धाव घेत सदर विद्यार्थी वर्गाच्या

पाठीशी उभे राहून पाठराखण केली. अनेक विदयार्थी हे चंद्रपूर, नागपूर, यवतमाळ, गडचिरोली आदि जिल्ह्यातून शहरात थंडीमध्ये आले होते. ऐनवेळी परीक्षा रद्द केल्यामुळे अनेक युवक, युवती ची फरफट झाली.

उच्च दर्जाच्या कंपनीना नियोजन न देता नवख्या कंपनीस सदर परीक्षेचे टेंडर देण्यात आले. या सर्व प्रकारामुळे विद्यार्थी वर्गात प्रचंड नाराजी असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबधित कंपनी विरुद्ध तत्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. यासंबंधी जिल्हाधिकारी कार्यालयं येथे निवेदन देण्यात आले. यावेळी दत्ता पोळ, विशाल जगताप, संजय निर्मळ, ऋषिकेश सोनवणे, रवींद्र गोगडे, सुनील तुपे, निलेश सोनवणे, निलेश माहोर, नितीन मुंढे, कृष्णा खाडे, विलास तांबे, संदिप गाडेकर, अशोक टेकाळे, दत्तात्रय गायके, शुभम चिकने, गोपाल सिंगल आदी परीक्षार्थी होती.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

मंगळवार, दि.२४ डिसेंबर २०२४ । पान ७

# बारामतीला देशात क्रमांक एकवर नेणार; उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही

**बारामती । प्रतिनिधी**

बारामतीकरांनी लाखाहून अधिक मताधिक्याने मला निवडून दिल्याने माझी जबाबदारी वाढली आहे. त्यामुळे गेल्या सात टर्मला झाली नाहीत एवढी विकासकामे आठव्या टर्ममध्ये करून बारामतीला देशात क्रमांक एकचे स्थान मिळवून देणार असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.



बारामती शहर-तालुका राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे आयोजित नागरी सत्कार समारंभात ते बोलत होते. खा. सुनेत्रा पवार, आ. अमोल मिटकरी, पार्थ पवार, दिगंबर दुर्गाडे, सुरेश पालवे, किरण गुजर, सचिन सातव, संभाजी होळकर, राजवर्धन शिंदे, जय पाटील, अनिता गायकवाड, ज्योती लडकत, पुरुषोत्तम जगताप, केशवराव जगताप, सुनील पवार, पोपटराव गावडे, विक्रम भोसले आदी या वेळी उपस्थित होते.

अजित पवार म्हणाले, राज्यासह बारामतीकरांनी लोकसभेला झटका दिल्याने माझ्यासह कार्यकर्ते सुद्धा चिंतेत होतो. परंतु, आम्ही ईव्हीएमला दोष न देता नव्या जोमाने कामाला लागलो. काही योजना आणल्या. मतदारांपुढे व्हीजन मांडले. त्यामुळे विधानसभेला महायुतीला न भूतो न भविष्यती यश मिळाले. त्यात लाडक्या बहिणींचा मोठा वाटा आहे.

हा निकाल महाविकास आघाडीला पचलेला नाही. त्यामुळे ते ईव्हीएमवर टीका करीत आंदोलन करत आहेत. सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा ईव्हीएमवर शंका घेणे अयोग्य असल्याचे स्पष्ट केले आहे. केवळ कार्यकर्त्यांना बरे वाटावे म्हणून मविआ आंदोलन करीत आहे. काँग्रेस एकसंघ असताना आणि विरोधी पक्ष कमकुवत असताना राज्याच्या स्थापनेपासून आजवर असे यश मिळाले नव्हते. यंदाही बारामतीकरांनी लाखाहून अधिक मताधिक्य दिल्याने आता जबाबदारी वाढली आहे. बारामतीच्या विकासासाठी कटिबद्ध आहे. मंत्रिमंडळात अर्थ आणि उत्पादन शुल्क अशी खाती मिळाली आहेत. त्याला योग्य न्याय देऊ. येत्या ३ मार्चला अर्थसंकल्प सादर करताना राज्याची आर्थिक शिस्त बिघडू न देता जनतेच्या अपेक्षांची पूर्तता करू अशी ग्वाही त्यांनी दिली.

तीन हत्ती चौकातील पाहणीबाबत त्यांनी नाव न घेता खा. सुळे यांना टोला लगावला. यापुढे विकासकामे करताना बुथ कमिट्यांना विचारूनच केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. बारामतीच्या विकासाचे व्हीजन त्यांनी उपस्थितांसमोर मांडले. केंद्राकडून ३ कोटी घरांची योजना राबवली जाणार असून त्यातील १० टक्के घरे राज्याला मिळावीत यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

केंद्र, राज्य, जिल्हा परिषद, नियोजन मंडळ आदींच्या माध्यमातून मोठा निधी आणून अनेक प्रकल्प मार्गी लावत पुढील पाच वर्षांत बारामतीला देशात क्रमांक एकचे स्थान मिळवून देणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

धमक नसेल तर कामे घेऊ नका

बारामतीत मधल्या काळात मलिदा गँग असा शब्दप्रयोग करून नाव खराब करण्याचे काम झाले. आपल्यातील काही मंडळी स्वतः कामे घेतात आणि ती दुस-यांना विकतात. त्यांनी कृपा करून हे धंदे बंद करावेत. तुमच्यात धमक व ताकद असेल तरच कामे घ्या. पारदर्शकतेला प्राधान्य द्या, असे आवाहन अजित पवार यांनी केले.

विचारधारा सोडणार नाही

महायुतीत आम्ही सहभागी असलो तरी पक्ष आपली विचारधारा सोडणार नाही. ध्येयधोरणे, विचारधारेशी प्रतारणा करणार नाही. उलट सहभागी पक्षांनाही महापुरुषांच्या विचारधारेने काम करायला लावू असे अजित पवार म्हणाले.

# स्व. आमदार मुक्ता टिळक यांच्या स्मृतीदिनानिमित्त कर्करोग तपासणी

**पुणे । प्रतिनिधी**

स्वर्गीय आमदार मुक्ताताई टिळक यांच्या दुसऱ्या स्मृतीदिनानिमित्त बी. जे. मेडिकल कॉलेज, ससून सर्वोपचार रुग्णालय, अमनोरा येस फाउंडेशन, रोटरी क्लब ऑफ पुणे कात्रज आणि मुक्ता टिळक मेमोरियल फाउंडेशन यांच्या विद्यमाने कसबा भागातील स्वच्छ' संस्थेच्या महिलांसाठी मोफत कर्करोग तपासणी शिबिर आयोजित केले होते.



दि. २२ डिसेंबर रोजी आयोजित शिबिरामध्ये स्वच्छच्या कचरावेचक १५० महिलांनी सहभाग नोंदवला. ज्यांना निदान झाले, त्यांना ससून रुग्णालयात शासनमान्य योजनांतर्गत उपचार केले जाणार आहेत. या शिबिरात डॉ. लता भोईर, अमनोरा येस फाउंडेशनचे अध्यक्ष अनिरुद्ध देशपांडे, उपाध्यक्ष विवेक कुलकर्णी उपस्थित होते.स्वर्गीय आमदार मुक्ताताईंच्या स्मरणार्थ मुक्ता टिळक मेमोरियल फाउंडेशन संस्थेची स्थापना करण्यात आली. मुक्ता टिळक या महापौर असताना शहरातील वंचित घटकातील नऊ हजार महिलांच्या कर्करोग तपासणीसाठी महापालिकेच्या अर्थसंकल्पात ४५ लाख रुपयांची तरतूद केली होती. तसेच महापालिकेच्या शाळेतील मुलींची शारीरिक तपासणी करण्याचा उपक्रमही राबविला गेला.गेल्या दीड वर्षांत संस्थेने आर्थिक दुर्बल असलेल्या एक हजारपेक्षा जास्त महिला आणि पुरुषांसाठी स्क्रिनिंग व तपासणी शिबिर मोफत आयोजित केली होती. यात ब्रेस्ट, सर्व्हायकल, लंग्ज व थ्रोट कॅन्सर या तपासण्यांची सुविधा उपलब्ध करून दिली. मागील वर्षात १७ कर्करोग रुग्णांना संस्थेद्वारे मोफत शस्त्रक्रिया, रेडिएशन व केमोथेरपी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# छगन भुजबळ मोठे नेते, फडणवीस-भुजबळ भेटीवर अजित पवारांची पहिली प्रतिक्रिया

**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि आमदार छगन भुजबळ यांनी आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीची सध्या राज्यभर जोरदार चर्चा सुरु आहे. यावर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मुख्यमंत्र्यांना कोणीही भेटू शकते. छगन भुजबळ हे मोठे नेते आहेत. लोकप्रतिनिधी आहेत असे अजित पवार म्हणाले.



राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री छगन भुजबळ यांनी मंत्रीमंडळात संधी न दिल्यामुळं ते नाराज आहेत. मंत्रीमंडळाचा विस्तार झाल्यावर भुजबळांनी हिवाळी अधिवेशन सोडून थेट नाशिक गाठलं होतं. दोन दिवस त्यांनी पदाधिकाऱ्यांशी कार्यकर्त्यांशी चर्चा बैठका घेतल्या होत्या. तसेच नाशिकमध्ये ओबीसींचा मेळावा देखील घेतला होता. त्यानंतर भुजबळ मुंबईत आले आहेत. अशातच आज छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. मुंबईतील सागर बंगल्यावर देवेंद्र फडणवीस आणि छगन भुजबळांमध्ये चर्चा झाली. महत्त्वाचं म्हणजे अजित पवारांना भेटण्याआधी भुजबळांनी फडणवीसांची भेट घेतली. त्यामुळे राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. यावर शेलार वेगवेगळ्या प्रतिक्रिया येत आहेत. भुजबळ भाजपमध्ये प्रवेश कराणार का? अशा देखील चर्चा सुरु आहेत. अशातच याबाबत अजित पवार यांनी देखील प्रतिक्रिय दिली आहे. मुख्यमंत्र्यांना कोणीही भेटू शकते. छगन भुजबळ हे मोठे नेते आहेत असे अजित पवार म्हणाले.

फडणवीसांच्या भेटीनंतर भुजबळ काय म्हणाले?

ओबीसींचे कदापी नुकसान मी होऊ देणार नाही. पण आता राज्यात जे काही सुरू आहे त्यामुळे मला आठ ते दहा दिवस तुम्ही द्या. आठ, दहा दिवसानंतर आपण पुन्हा भेटू आणि निश्चितपणे काहीतरी चांगला मार्ग यातून काढू, असे आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याचे छगन भुजबळ यांनी सांगितले. तर ओबीसी नेत्यांनी थोडं शांततेने घ्यावे, दहा-बारा दिवसात आपल्याला जेवढं काही चांगलं करता येईल त्याबाबत आपण संपूर्ण चर्चा करू, अशी विनंती देखील फडणवीस यांनी केल्याचे छगन भुजबळ म्हणाले आहेत.

कोरेगाव भीमा इथं आलेल्या नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी घेतली बैठक

दरम्यान, १ जानेवारीला कोरेगाव भीमा विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी देशभरातून लाखो भाविक येततात. या ठिकाणी आलेल्या नागरिकांची गैरसोय होऊ नये. यासाठी आज आढावा घेतल्याची माहिती अजित पवार यांनी दिली आहे. पार्किंगपासून ते औषध विभागापर्यंत सगळी माहिती आज अजित पवार यांनी घेतली. यासाठी निधी उपलब्ध करुन देणार असल्याचे अजित पवार म्हणाले.

# पुण्यात कार चालकाची मुजोरी; उड्डाणपुलावर दिली दुचाकीस्वार दाम्पत्याला धडक

**पुणे । प्रतिनिधी**

भरधाव कारने दुचाकीस्वार दाम्पत्याला धडक दिल्याची घटना गुलटेकडीतील उड्डाणपुलावर घडली आहे. अपघात झाल्यानंतर जखमी झालेल्या दाम्पत्याला मदत न करता चालक पसार झाला आहे. याप्रकरणी कारचालकावर स्वारगेट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबत प्रकाश बाफना (वय ५८, रा. भूमीव्हिला सोसायटी, मार्केट यार्ड) यांनी स्वारगेट पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.



पोलिसांच्या माहितीनुसार, प्रकाश बाफना, त्यांची पत्नी व मित्र सहकुटुंब शनिवारी (२१ डिसेंबर) रात्री टिळक रस्त्यावरील उपाहारगृहात गेले होते. तेथून बाफना दाम्पत्य दुचाकीवरुन रात्री साडेदहाच्या सुमारास घरी निघाले होते. गुलटेकडी ते मार्केट यार्ड दरम्यान असलेल्या उड्डाणपुलावर भरधाव कारने दुचाकीस्वार बाफना यांना धडक दिली. बाफना दाम्पत्य रस्त्यात पडले. अपघातानंतर घटनास्थळी न थांबता, तसेच बाफना दाम्पत्याला मदत न करता मोटारचालक भरधाव वेगात पसार झाला.

अपघातानंतर बाफना दाम्पत्याला तातडीने खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. बाफना यांना गंभीर दुखापत झाली. त्यांचे दोन्ही हात फ्रॅक्चर झाले. त्यांच्या पत्नीला गंभीर दुखापत झाली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज नांद्रे यांनी घटनास्थळी भेट दिली. पसार झालेल्या मोटारचालकाचा शोध घेण्यात येत असून, पोलीस नाईक विनोद धामणगावकर अधिक तपास करत आहेत.

महिला पोलिसाला कारने उडवले

दरम्यान गेल्या काही दिवसाखाली ड्रंक अँड ड्राईव्हच्या कारवाईनिमित्त नाकाबंदी करून कारवाई करत असताना एका भरधाव आलिशान कारने कर्तव्य बजावणाऱ्या वाहतूक विभागातील महिला कर्मचाऱ्याला उडविल्याची धक्कादायक घटना घडली. यात महिला कर्मचारी गंभीररित्या जखमी झाल्या असून, त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, आलिशान कारमध्ये चौघेजन असल्याचे माहिती समोर आली. महिला अंमलदार दीपमाला राजू नायर (वय ३५) असे गंभीर जखमी झालेल्या महिला कर्मचाऱ्याचे नाव आहे. याप्रकरणी बंडगार्डन पोलीस ठाण्यात अज्ञात चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुणे पोलीस 'ॲक्शन मोडवर'

बेशिस्त वाहन चालकांमुळे देखील या वाहतूक कोंडीत भर पडते. तर अपघाताला देखील निमत्रंण मिळते. गेल्या काही दिवसांत वाहतूक पोलिसांनी ट्रिपलशिट, विरूद्ध दिशेने वाहने चालविणारे तसेच मोबाईल टॉकिंग अशांवर जोरदार कारवाई सुरू केली. वाहने देखील जप्त करण्यात येत होती. नंतर आता पोलिसांनी थेट गुन्हे दाखल करण्यास सुरूवात केली आहे. आता थेट पोलिसांनी बेशिस्तांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई केली जात असून, यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हे दाखल करण्याची मोहिम हाती घेतली आहे. यात धोकादायक पद्धतीने वाहन चालविणाऱ्यांसह रस्त्यावर वाहतुकीला अडथळा करणाऱ्यांवर प्रामुख्याने कारवाई केली जात आहे, असे दाखल गुन्ह्यांचे विश्लेषण केल्यावर दिसून येते.

# सवाईमध्ये व्हायोलिन, बासरीवादनाची जुगलबंदी

**पुणे । प्रतिनिधी**

७० व्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवाच्या अखेरच्या दिवशीच्या पहिल्या सत्रात गायक पं. संजीव अभ्यंकर यांचे अहिरभैरव रंगले; तर दाक्षिणात्य शैलीतील व्हायोलिन आणि बासरीवादनाला जुगलबंदीलाही रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला.



आपण कुणीच झाकीर हुसेन यांना विसरू शकत नाही, असे कार्य त्यांनी केले आहे. मी याच स्वरमंचावर झाकीरभाईंना ४० वर्षांपूर्वी भेटलो होतो.

त्यांचे स्मरणही ऊर्जा देणारे आहे. पं. भीमसेनजींच्या मनात माझ्याविषयी हळवा कोपरा होता. मी झाकीरभाई आणि भीमसेनजी, तसेच गुरू पं. जसराज यांच्या स्मृतींना वंदन करून गायन सुरू करतो, असे मनोगत पं. संजीव अभ्यंकर यांनी व्यक्त केले.

राग अहिरभैरवमध्ये विलंबित एकतालात 'रसिया म्हारा' हा ख्याल त्यांनी प्रथम सादर केला. रसिकांच्या आग्रहास्तव त्यांनी समर्थ रामदासांचा 'ध्यान लागले रामाचे..' हा अभंग सादर केला.

चढती दुपार संस्मरणीय ठरली, ती शशांक सुब्रह्मण्यम यांच्या बासरीवादन आणि आर. कुमरेश यांच्या व्हायोलिन जुगलबंदीमुळे. कर्नाटक शैलीच्या रागातील विविध 'कृती' या कलाकारांनी सादर करून रसिकांना वेगळा आनंद दिला.

# वारजे परिसरात तब्बल १६ वाहनांची तोडफोड

**पुणे । प्रतिनिधी**

वारजे परिसरात एका टोळक्याने पहाटे तीनच्या सुमारास तब्बल १६ चारचाकी वाहनांच्या काचा फोडल्या. हा प्रकार सीसीटीव्हीमध्ये कैद झाला असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

या प्रकरणी अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोकुळनगर भागात पहाटे तीन तरुण रस्त्याने पायी चालले होते. जाताना दिसेल त्या वाहनावर रस्त्यावर पडलेले दगड मारुन ते काच फोडत होते. त्यांनी अशा प्रकारे तब्बल सोळा वाहनांच्या काचा फोडल्या. यामध्ये टेम्पो, रिक्षा आणि व्हॅन यांचा समावेश होता.

या वाहनांचे मालक वाहने चालवून किंवा भाड्याने देऊन आपला उदरनिर्वाह करतात. यामुळे नागरिकांकडून संताप व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोज शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करण्यात येत आहे.



# बकोरी येथील वनराईत पुन्हा एकदा समाजकंटकांकडून आग

## हजारो पक्षी, सरपटणारे प्राणीही होरपळले

बकोरी (ता. हवेली) येथील देवराई वनराई प्रकल्पात २ दिवसांपूर्वी समाजकंटकांनी पुन्हा एकदा आग लावली. या आगीत तब्बल ५ हजार झाडे आणि ठिबक पाइपांचे नुकसान झाले. याशिवाय हजारो पक्षी, सरपटणारे प्राणीही यामध्ये होरपळून गेले.

आग लागल्याचे समजताच वृक्षप्रेमी चंद्रकांत वारघडे आणि त्यांचा मुलगा धनराज यांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र आगीची तीव-ता जादा असल्याने त्यांचे प्रयत्न अपुरे पडत होते. वारघडे यांनी तातडीने सोशल मीडियातून आवाहन केले. त्यानंतर वाघोली येथील वृक्षमित्र गणेश जाधव, माहिती सेवा समितीचे हवेली तालुकाध्यक्ष कमलेश बहिरट, प्रकाश नागरवाड, रवी सलगरे हे घटनास्थळी दाखल झाले.

दरम्यान वनराईचे कामगार आणि सुजित गाडुते पाणी घेऊन घटनास्थळी हजर झाले. तोपर्यंत आगीने अजून रौद्र रूप धारण केले. त्यामुळे वन विभागाला याबाबत माहिती देण्यात आली. वन कर्मचारी यांनी आग नियंत्रणात आणण्यासाठीचे यंत्र आणले आणि सर्वांनी मिळून आगीवर नियंत्रण मिळवण्यास सुरुवात केली.धनराज वारघडे या एव्हरेस्टवीर तरुणाने तब्बल २ तास यंत्र चालिवत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. कमलेश यांनी वाघोली येथील अग्निशामक कार्यालयात फोन केला आणि अग्निशामकची गाडी आणि कर्मचारी आले. परंतु डोंगरावर असणारा रस्ता खराब असल्याने गाडी वर येणे अशक्य होते.

त्यातही मोठ्या कसरतीनंतर गाडी वर आणण्यात यश मिळाले. त्यानंतर अग्निशामक दलाचे गोरख दराडे, मयूर गोसावी, विश्वास दराडे, कृष्णा नांगरे यांनी आग आटोक्यात आणली. सकाळी ८ वाजता लागलेली आग दुपारी ४ वाजता शमली. तोपर्यंत १०० एकरावरील वनसंपदा जळून खाक झाली. एकूण ५ हजार झाडे व त्याबरोबर ठिबक सिंचनाचे पाइप जळाले. डोंगरावर अनेक जण क्रिकेट खेळायला येत असतात आणि रात्रीसुद्धा त्यांच्या पार्ट्या चालू असतात. त्यांच्यापैकी कोणीतरी आग लावल्याची शक्यता वारघडे यांनी व्यक्त केली. याबाबत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# पुण्यात चोरट्यांचा धुमाकूळ; 'या' भागातून रोकड अन् सोनसाखळी हिसकावले

पुणे : पुणे शहरात गर्दीत रोकड तसेच पादचारी व वाहन चालकांना लुटणाऱ्या चोरट्यांनी उच्छाद घातला आहे. बिनदक्त चोरटे चोऱ्या करत असताना दिसत आहेत. चोरट्यांचा माग काढत असताना देखील त्यांचा थांगपत्ता लागत नसल्याचे वास्तव आहे. शहरात वेगवेगळ्या चार घटना घडल्या असून, याप्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.



पहिल्या घटनेत याप्रकरणी वारजे पोलीस ठाण्यात ७० वर्षीय महिलेने तक्रार दिली आहे. त्यानूसार, अनोळखी व्यक्तीवर गुन्हा नोंद केला आहे. तक्रारदार या कर्वेनगरमधील विठ्ठल मंदिरात दर्शनासाठी गेल्या होत्या. दर्शन घेऊन त्या पायी चालत वापस घरी निघाल्या होत्या. तेव्हा सकाळी साडे आकराच्या सुमारास दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांनी त्यांच्याजवळ येत गळ्यातील ४० हजारांची रोकड चोरून नेली आहे.

दुसरी घटना भीमथडी जत्रेत घडली असून, स्टॉलधारक व्यावसायिक महिलेच्या पिशवीतून चोरट्यांनी ७० हजारांची रोकड व पेनड्राईव्ह चोरुन नेल्याची घटना घडली. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केला आहे. सिंचनगर भागातील मैदानावर भीमथडी जत्रेचे आयोजन केलेले आहे. तक्रारदार कोथरूड भागातील आहेत. त्यांनी भीमथडी जत्रेत मेश्तो नावाने कपडे विक्रीचा स्टॉल सुरू केला आहे. शुक्रवारी सायंकाळी स्टॉलच्या भागात गर्दीतून चोरट्यांनी महिलेचे लक्ष नसल्याची संधी साधली. ७० हजारांची रोकड, पेनड्राईव्ह असलेली पिशवी चोरुन चोरटे पसार झाले. सहायक पोलीस निरीक्षक सविता सपकाळे तपास करत आहेत.

विवाह समारंभात महिलेचे दीड लाखांचे दागिने चोरले

विवाह समारंभातून ज्येष्ठ महिलेचे दीड लाखांचे दागिने ठेवलेली पिशवी चोरुन नेल्याची घटना नगर रस्ता भागातील एका मंगल कार्यालयात घडली. याबाबत ६६ वर्षीय ज्येष्ठ महिलेने लोणीकंद पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. तक्रारादार महिला चंदननगर भागात राहायला आहेत. त्यांच्या नात्यातील एकाचा विवाह गेल्या महिन्यात होत्या. फुलगाव येथील एका मंगल कार्यालयात विवाह समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ महिलेने दीड लाखांचे दागिने असलेली पिशवी मंगल कार्यालयातील खोलीत ठेवली होती. महिलेचे लक्ष नसल्याची संधी साधून चोरट्याने दागिने ठेवलेली पिशवी चोरुन नेली. विवाह समारंभ पार पडल्यानंतर महिलेने नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. सहायक पोलीस निरीक्षक विजया वंजारी तपास करत आहेत.

हडपसरमध्ये पादचारी तरुणाचा मोबाइल चोरीला

पादचारी तरुणाचा मोबाइल दुचाकीस्वार चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना हडपसर भागात घडली आहे. याबाबत एका ३७ वर्षीय तरुणाने हडपसर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार तरुण शुक्रवारी (२० डिसेंबर) दुपारी सव्वाचारच्या सुमारास हडपसर भागातील भगीरथीनगर भागातून निघाला होता. यावेळी दुचाकीस्वार चोरट्यांनी तरुणाच्या खिशातील मोबाइल चोरुन नेला. तरुणाने आरडाओरड केला. चोरटा भरधाव वेगात पसार झाला. सहायक पोलीस निरीक्षक अर्जुन कुदळे तपास करत आहेत.